निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे

# आदर्श कला महाविद्यालय

## निजामपूर-जैताणे

## ता. साक्री जि. धुळे

* नॅक प्रमाणित *




# ज्ञानदीप

वार्षिक नियतकालिक - २०१९-२०२०

# आदर्श कला महाविद्यालय

निजामपूर - जैताणे ता. साक्री जि. धुळे

* नॅक पुर्नप्रमाणित *

# ज्ञानदीप

वार्षिक नियतकालिक

२०१९-२०

संपादक

**डॉ. विजय जी. गुरव**

| सदस्य | सदस्य |
|---|---|
| डॉ. प्रविण बी. मोरे | प्रा. आतिष एस. मेश्राम |
| सदस्य | सदस्य |
| प्रा. अजबराव रा. इंगळे | डॉ. प्रियंका पी. सुलाखे |

प्रकाशन स्थळ :- आदर्श कला महाविद्यालय निजामपूर-जैताणे,
ता. साक्री जि. धुळे

प्रकाशन काळ :- वार्षिक

प्रकाशक :- प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार

राष्ट्रीयत्व :- भारतीय

पत्ता :- आदर्श कला महाविद्यालय निजामपूर-जैताणे,
ता. साक्री जि. धुळे

संपादक :- डॉ. विजय गजानन गुरव

राष्ट्रीयत्व :- भारतीय

पत्ता :- आदर्श कला महाविद्यालय निजामपूर-जैताणे,
ता. साक्री जि. धुळे

मुद्रक :- ऋद्र क्रिएशन्स,
माणिक चौक, शिरीष कुमार स्मारक समोर,
नंदुरबार ता.जि. नंदुरबार. मो. ९८२३७२४७०५

(सदर अंकातील लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही)

# निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे

## ❋ सन्माननीय सदस्य ❋

| अ.क्र. | सन्मानीय सदस्यांचे नांव | | हुद्दा |
|---|---|---|---|
| १) | मा.काकासो. श्री. दशरथ नारायण पाटील | - | अध्यक्ष |
| २) | मा.बाबासो. श्री. शरदचंद्र जगन्नाथ शाह | - | अध्यक्ष, वरीष्ठ महाविद्यालय |
| ३) | मा.भाईसो. श्री. सुहास विष्णूदास शाह | - | उपाध्यक्ष |
| ४) | मा.भाईसो. श्री. अजितचंद्र जगन्नाथ शाह | - | अध्यक्ष, शालेय समिती |
| ५) | मा.दादासो. श्री. बारीक यादव पगारे | - | सदस्य |
| ६) | मा.नानासो. श्री. दत्तात्रय जगन्नाथ वाणी | - | खजिनदार |
| ७) | मा.भाईसो. श्री. नितीनकुमार मणिलाल शाह | - | सचिव |
| ८) | मा.भाईसो. श्री. किशोर शांतिलाल शाह | - | सहसचिव |
| ९) | मा.श्री. विठ्ठलराय राजेश्वर उपासनी | - | सदस्य |
| १०) | मा.दादासो. श्री. राजेंद्र जगन्नाथ वाणी | - | सदस्य |
| ११) | मा.आप्पासो. श्री. राजेंद्र मुरलीधर वाणी | - | सदस्य |
| १२) | मा.दादासो. श्री. राघो बळीराम पगारे | - | सदस्य |

# आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे

## ❋ सन्माननीय सदस्य ❋

| अ.क्र. | सन्मानीय सदस्यांचे नांव | | हुद्दा |
|---|---|---|---|
| १) | मा.बाबासाो. श्री. शरदचंद्र जगन्नाथ शाह | - | अध्यक्ष |
| २) | मा.काकासो. श्री. दशरथ नारायण पाटील | - | सदस्य |
| ३) | मा.भाईसाो. श्री. नितीनकुमार मणिलाल शाह | - | सदस्य |
| ४) | मा.नानासाो. श्री. दत्तात्रय जगन्नाथ वाणी | - | सदस्य |
| ५) | मा.भाईसाो. श्री. अजितचंद्र जगन्नाथ शाह | - | सदस्य |
| ६) | मा.श्री. विठ्ठलराय राजेश्वर उपासनी | - | सदस्य |
| ७) | मा.प्राचार्य डॉ. अशोक पितांबर खैरनार | - | सचिव |

निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे

# आदर्श कला महाविद्यालय

निजामपूर-जैताणे ता. साक्री जि. धुळे

⁂ नॅक पुर्नप्रमाणित ⁂

**⁂ आमचे श्रद्धास्थान ⁂**

अध्यक्ष - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ



## मा.काकासो.श्री. दशरथ नारायण पाटील

निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे

# आदर्श कला महाविद्यालय

निजामपूर-जैताणे ता. साक्री जि. धुळे

⁂ नॅक पुर्नप्रमाणित ⁂

**⁂ आमचे प्रेरणास्थान ⁂**

अध्यक्ष - आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे



**मा.बाबासो.ॲड.श्री. शरदचंद्र जगन्नाथ शाह**

निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे

# आदर्श कला महाविद्यालय

निजामपूर-जैताणे ता. साक्री जि. धुळे

❊ नॅक पुर्नप्रमाणित ❊

**❊ आमचे मार्गदर्शक ❊**



प्राचार्य डॉ. अशोक खैरनार

# निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे सन्माननिय पदाधिकारी

## निजामपूर-जैताणे ता. साक्री जि. धुळे

अध्यक्ष - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ
सदस्य - आदर्श कला महाविद्यालय



**मा.काकासो. श्री. दशरथ नारायण पाटील**

अध्यक्ष - आदर्श कला महाविद्यालय
सदस्य - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ



**मा.बाबासो. श्री. शरदचंद्र जगन्नाथ शाह**

उपाध्यक्ष - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ




**मा.भाईसो. श्री. सुहास विष्णुदास शाह**

अध्यक्ष, शालेय समिती निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ
सदस्य - आदर्श कला महाविद्यालय



**मा.भाईसो. श्री. अजितचंद्र जगन्नाथ शाह**

सदस्य - निजामपूर-जैताणे शिक्षण
प्रसारक मंडळ



**मा.दादासो. श्री. बारीक
यादव पगारे**

खजिनदार निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ
सदस्य - आदर्श कला महाविद्यालय



**मा.नानासो. श्री. दत्तात्रय
जगन्नाथ वाणी**

सचिव - निजामपूर-जैताणे शिक्षण
प्रसारक मंडळ
सदस्य - आदर्श कला महाविद्यालय



**मा.भाईसो. श्री. नितीनकुमार
मणिलाल शाह**

सहसचिव - निजामपूर-जैताणे शिक्षण
प्रसारक मंडळ



**मा.भाईसो. श्री. किशोर
शांतीलाल शाह**

सदस्य - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ
सदस्य - आदर्श कला महाविद्यालय



**मा.श्री. विठ्ठलराय राजेश्वर उपासनी साहेब**

सदस्य - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ




**मा.दादासो. श्री. राजेंद्र जगन्नाथ वाणी**

सदस्य - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ




**मा.आप्पासो. श्री. राजेंद्र मुरलीधर वाणी**

सदस्य - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ



**मा.दादासो. श्री. राघो बळीराम पगारे**

# महाविद्यालय विकास समिती सदस्य



डॉ. सुधाकर लो. जाधव
(सदस्य)



डॉ. रविन्द्र पो. ठाकरे
(सदस्य)



डॉ. कांतीलाल दा. सोनवणे
(सदस्य)



डॉ. विजय ग. गुरव
(सदस्य)



श्री. अशोक द. खैरनार
(सदस्य)



प्रा. आतिश मेश्राम
(सदस्य)



डॉ. प्रियंका पी. सुलाखे
(सदस्य)



सौ. छाया बळीराम अहिरे
(सदस्य)

# प्राचार्यांचे मनोगत

महाविद्यालयाचा Silver Jubilee वर्षाचा नियतकालिक अंक आपल्या सर्वांच्या हाती सुपूर्द करतांना मला मनस्वी आनंद होत आहे. **ज्ञानदीप** नियतकालिक महाविद्यालयीन तरूणाईच्या प्रतिभा, विचार, अभिव्यक्ती व सृजनशिल सशक्त माध्यम आहे. विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव व त्यांच्या समाजाविषयी संवेदना तसेच राष्ट्राविषयी प्रेम, निष्ठा निर्माण करण्यासाठी महाविद्यालय नेहमी प्रयत्न करीत असते. Empower the rural, hilly and tribal students with life oriented quality education is the mission of the college.

महाविद्यालयाने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या Academic Audit मध्ये 'A' Grade संपादीत केली आहे. NAAC third cycle ची तयारी सुरू आहे. विद्यार्थ्यांचा अभ्यास व अभ्यासकेतर उपक्रमांमधून सर्वांगिण विकास साधला जात आहे. ते ज्ञानाने समृद्ध व्हावे म्हणून विविध विषयांचे Add on Courses महाविद्यालयात चालविले जातात. विद्यार्थ्यांमध्ये Global leadership निर्माण व्हावी म्हणून त्यांच्यासाठी Communication Skills, Soft Skill and Presentation Skill आदी विषयांवर विद्यापीठस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थीनींनी सक्षम व्हावे, साहसी व्हावे, त्यांच्यामध्ये नेतृत्व गुण विकसीत व्हावे तसेच संगणकदृष्ट्या कुशल व्हावे Digital Literacy for Women Empowerment या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. त्याचबरोबर कराटे व योगाचे आठ दिवसीय प्रशिक्षण देण्यात आले.

ज्ञान साधनेबरोबर संशोधनाची विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा निर्माण व्हावी म्हणून प्राध्यापकांबरोबर विद्यार्थ्यांना क.ब.चौ.उ.म.वि. जळगांव आविष्कार मध्ये सहभागी करण्यात आले. त्यात प्राध्यापक व विद्यार्थीनींचे संशोधन पोस्टर विद्यापीठ स्तरावर निवडले गेले. ही अत्यंत गर्वाची व अभिमानाची बाब वाटते. तसेच महाविद्यालयातील सिनीयर विद्यार्थ्यांच्या रिसर्च पेपर साठी Rukhmini Narayan Bedse International Research Award अमेरिका स्थित Prof. P.N. Patil प्रायोजित पुरस्कार कु. अश्विनी जाधव या विद्यार्थीनीस मिळाला.

महाविद्यालयामध्ये इंग्रजी, हिन्दी, मराठी, राज्यशास्त्र व समाजशास्त्र असे पाच विषयांचे संशोधन केंद्र आहेत. त्यातून शिक्षणाबरोबर संशोधन वृत्ती वाढीस लागत आहे. विद्यार्थी व्यसनापासून लांब राहावेत यासाठी Anti Tobacco Day सारखे उपक्रम महाविद्यालयात राबविण्यात येतात.

विद्यार्थी विकास केंद्रबिंदू मानून महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभाग कार्यरत आहे. त्याचबरोबर गरीब, होतकरू विद्यार्थ्यांसाठी आर्थिक दुर्बल घटक योजना व कमवा व शिका योजना कार्यरत आहेत.

आज Covid-१९ या जागतिक जीवघेण्या महामारीने संपूर्ण जग प्रभावित झाले आहे. त्यात शिक्षणक्षेत्र सुद्धा अपवाद नाही. त्यात क्लासरूपम टिचिंगला पर्याय म्हणून ऑनलाईन टिचिंग स्विकारावे लागले. महाविद्यालयाने ऑनलाईन टिचिंग व Webinars यशस्वीपणे आयोजित केले.

महाविद्यालयाने सामाजिक बांधिलकी व मूल्य शिक्षण रूजावे म्हणून एन.एस.एस. विभागामार्फत स्वच्छ भारत अभियान, अंधश्रद्धा निर्मुलन, वृक्षारोपण, जलसंधारण, बेटी बचाव बेटी पढाव अभियान सारखे अनेकविध उपक्रम राबविले.

विद्यार्थी संगणकीयदृष्ट्या साक्षर व्हावे म्हणून Pradhan Mantri Gramin Digital Saksharta Abhiyan हा सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी यशस्वीपणे राबविला.

महाविद्यालयाने संशोधन क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी कली. सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर बंधू-भगिनींनी विविध राष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये तसेच Webinars मध्ये आपले संशोधन लेख सादर करून प्रकाशित केले. प्राचार्य डॉ. अशोक खैरनार यांनी ICSSR Sponsored "Social-linguistic study of the Bhilari Dialect in Nandurbar District" या विषयावर दोन लाख रूपयांचा Minor Research Project ICSSR, New Delhi येथे पूर्ण करून सादर केला.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आयोजित 'आविष्कार' स्पर्धेमध्ये आमच्या महाविद्यालयाचे जवळपास १५ विद्यार्थी-विद्यार्थीनी व प्राध्यापकांनी सहभाग नोंदविला व त्यातून २ विद्यार्थीनी व २ प्राध्यापकांची निवड होऊन त्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. याची दखल घेत विद्यापीठाचे मा. कुलसचिव प्रा.डॉ. बी.बी. पवार साहेबांनी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्याचबरोबर Ministry of Education, Government of India द्वारे सुरू करण्यात आलेले National Institutional Ranking Framework (NIRF) मध्ये विद्यालयाने सहभाग नोंदविला.

महाविद्यालयाने Silver Jubilee Year विविध उपक्रमांनी साजरे करून एक ओळख निर्माण केली. गेली २५ वर्षे सतत गुणवत्ताधारक, दर्जेदार, चारित्र संपन्न करणारे, राष्ट्रीयत्व निर्माण शिक्षण देवून विद्यार्थ्यांना लाभान्वित केले व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आपली एक Small but beautiful महाविद्यालय म्हणून ओळख निर्माण केली. यासाठी नि.जै.शि. प्रसारक मंडळाचे मा. अध्यक्ष, सन्माननीय संचालक मंडळ व महाविद्यालयाचे अध्यक्ष मा.ॲड. शरदचंद्र जगन्नाथ शाह यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. म्हणून मी त्यांचे आभार व्यक्त करतो. सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर बंधू-भगिनींच्या अथक परिश्रमातून ज्ञानादानाचा यज्ञ समर्थपणे सुरू राहील. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना मी सांगू इच्छितो की, Covid-१९ संकटाला सामोरे जातांना Positivity, creativity in adversity फार आवश्यक आहे. Covid-१९ संकट जाईल, चांगले आनंदाचे दिवसही येतील. If winter comes can spring be far behind हा निसर्ग नियम आपल्याला माहित आहे.

सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा...!

धन्यवाद!

**प्रा.डॉ.अशोक पी. खैरनार**
प्राचार्य
आदर्श कला महाविद्यालय
निजामपूर-जैताणे

*****

# संपादकीय....

प्रिय वाचक मित्र हो,

सन २०१९-२० चा वार्षिक **"ज्ञानदीप"** नियतकालीकाचा अंक आपल्या हाती देतांना मला मनस्वी आनंद होत आहे. या अंकात आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व इत्यादी घटकांनी लिहिलेले लेख, संपादित लेख, कथा, कविता, विविध कार्यक्रमांची छायाचित्रे व त्यांच्या कार्याचे प्रतिबिंब प्रकट झालेले दिसेल. हा अंक म्हणजे आमच्या महाविद्यालयाचे दर्शन घडविणारा आरसाच होय.

निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आदर्श कला महाविद्यालय ग्रामिण भागात व माळमाथा परिसरात उच्च शिक्षणाचे बीजारोपण करणारे व या भागातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास करणारे महाविद्यालय आहे. या अंकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंगात असलेल्या सुप्त लेखकाला जागृत करण्याचा प्रयत्न आम्ही करीत असतो.

आमचे महाविद्यालय शिक्षण, क्रिडा, संशोधन आणि सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी सर्व बाबतीत आपली क्षमता सिध्द करण्याचा प्रयत्न करीत आहे. महाविद्यालयाच्या वतीने दरवर्षी नवरात्र व्याख्यान मालेचे आयोजन केले जाते. वेगवेगळया क्षेत्रातील तज्ञ मार्गदर्शकांना आमंत्रिच करून विद्यार्थी व गावातील नागरिकांमध्ये जागृतता निर्माण करण्याचा प्रयत्न महाविद्यालयाच्या वतीने केला जातो. विद्यार्थीनीसाठी सात दिवसांचे "स्वयंसिध्दा" कराटे प्रशिक्षण तसेच युवती सभेचे आयोजन करण्यात येते. त्याचबरोबर विविध क्रिडा स्पर्धासाठी विद्यार्थ्यांना तज्ञ प्रशिक्षकांद्वावरे मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थी विकास अंतर्गत विविध मान्यवरांना आमंत्रित करून विद्यार्थ्यांना बौद्धिक मार्गदर्शन वर्ग घेतले जातात. आमच्या विविध महापुरूषांची जयंती, पुण्यतिथी तसेच जागतिक हिन्दी दिवस, भूगोल दिवस, विश्‍व आदिवासी दिन, योगा दिवस आदि महत्वपूर्ण दिवस साजरे केले जातात. आमच्या महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांच्या चिकित्सक बुद्धीचा विकास करणे, ज्ञानाचा विकास करणे, नितीमत्ता जोपासणे तसेच विविध क्षेत्रातील कलागुण आत्मसात करून चौफेर विकासावर पुरेपुर भर देण्याचा प्रयत्न केला जातो. ज्ञानदानाच्या रुपाने विद्यार्थ्यांना आपले जीवन फुलविण्याची अभूतपूर्व संधी उपलब्ध करुन देणारे, भविष्याची स्वप्ने पाहायला, जगायला आणि साकार करायला प्रेरणा देणारे हे महाविद्यालय आहे.

या महाविद्यालयात शैक्षणिक, क्रिडा, वक्तृत्व, वादविवाद इ. क्षेत्रात नैपुण्य मिळविणारे विद्यार्थी जसे आहेत तसेच विविध क्षेत्रात संशोधन करुन यश मिळविणारे प्राध्यापक, संशोधन कार्यासाठी प्रेरणा देणारे आणि गती देणारे मार्गदर्शक, महाविद्यालयाचा विकास साधणारे प्राचार्य, ग्रामिण भागात शिक्षणाचे रोप लावणारे अध्यक्ष व जीव ओतून काम करणारे कर्मचारी वृंद आणि महाविद्यालयाच्या उन्नतीसाठी व सामाजिक विकासासाठी तन-मन-धनाने झिजणारी आमची व्यवस्थापन समिती. या सर्वांच्या विविध यशाची यशोगाथा म्हणजे आमच्या महाविद्यालयाचा **"ज्ञानदीप"** अंक होय.

सामाजिक प्रबोधनाच्या कार्यात आमचे ग्रामीण भागातील महाविद्यालय अगदी अग्रेसर मानले जाते. विविध उपक्रमांतर्गत उत्कृष्ठ कामगिरी केल्याबद्दल आमच्या महाविद्यालयास व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय, विद्यापीठस्तरीय तसेच महाविद्यालयीन स्तरावर विविध पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

आमच्या या सर्व कार्याला प्रेरणा देणारे महाविद्यालयाचे अध्यक्ष आदरणीय ॲड. बाबासाहेब शरदचंद्र शाह व व्यवस्थापन मंडळ होय. त्यांच्याच प्रेरणेने, सहकार्याने आणि मार्गदर्शनाने हे सर्व साध्य झाले आहे. मा.प्राचार्य, प्राध्यापक बंधु, शिक्षकेत्तर कर्मचारी बंधु यांचेही बहुमोल सहकार्य लाभले. तसेच संपादक मंडळातील सर्व सहकारी, विद्यार्थी लेखक या अंकाचे प्रिंटींग करणारे, सजावट करणारे तसेच प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहकार्य करणारे सर्वांचे ऋण स्विकारुन आणि या अंकात ज्या काही उणीवा असतील त्या माझ्या मर्यादा समजुन अंकाचा स्विकार करावा व प्रतिक्रिया कळवाव्यात अशी विनंती करतो.

धन्यवाद!

**डॉ. विजय ग. गुरव**
सहाय्यक प्राध्यापक
आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर जैताणे

*****

# ❀ अंतरंग ❀



- **आदिवासी जननायक बिरसा मुंडा** - कु. अश्विनी युवराज पवार
- **मेळघाटातील स्वामिनी -** कु. लक्ष्मी गोकुळ गवळे
- **पर्यावरण व्यवस्थापन -** कु. माधुरी बोरसे
- **पर्यावरण शिक्षण -** पवन ठाकरे
- **म. गांधींचे विचार : दहशतवादावर उपाय -** कु. पुनम सुनिल जगदाळे
- **लोकशाही पुढील आव्हान - राजकारणाचे गुन्हेगारीकरण -** कु. मनिषा खंडू गवळे
- **जीवाणू युद्ध -** कु. माधुरी पांडुरंग बोरसे
- **सायबर युद्ध -** कु. मयुरी भिका सोनवणे
- **पद -** कु. मयुरी भिका सोनवणे
- **संगीतशास्त्र -** कु. अक्षिता अरूण बदामे
- **जीवन विकास -** नंददीप गवरलाल सुर्यवंशी
- **मवाळवादी नेते फिरोजशाह मेहता -** कु. जगदाळे भाग्यश्री सुनिल
- **गोपाळ कृष्ण गोखले -** कु. बाविस्कर सुचिता राजेंद्र
- **महाभारताचे नऊ सार सूत्र -** प्रविण नारायण कारंडे
- **दीपावली का बदलता स्वरूप -** कु. सविता अहिरे
- **भारतीय त्यौहारों का बदलता स्वरूप : ग्रामीण और शहरी -** कु. रविना मोहने
- **Mahatma Gandhi : The Father of the Nation - Miss. Jayshree Gawle**
- **Good Thoughts by Great Persons - Misbah Shaikh**
- **E-Content Development - Ku. Ashwini Avinash Jadhav**


## अहवाल विभाग


- **Internal Quality Assurance Cell (IQAC)**
- **State Level Workshop on Interview Techniques and Confidence Building**
- **परीक्षा समिती अहवाल**
- **विद्यार्थी विकास अहवाल**
- **राष्ट्रीय सेवा योजना अहवाल**
- **स्वयंसिद्धा अभियान अहवाल**
- **युवती व्यक्तिमत्व विकास चर्चासत्र**
- **एक दिवशी राष्ट्रीय कार्यशाळा - महिला सक्षमीकरणासाठी डिजिटल साक्षरता**

- कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका
- म. गांधी विचार संस्कार परीक्षा अहवाल
- इंग्रजी विभाग अहवाल
- हिन्दी विभाग अहवाल
- मराठी विभाग अहवाल
- समाजशास्त्र विभाग अहवाल
- राज्यशास्त्र विभाग अहवाल
- संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग अहवाल
- भूगोल विभाग अहवाल
- प्रवेश समिती अहवाल
- क्रीडा विभाग अहवाल
- ग्रंथालय विभाग अहवाल
- सांस्कृतिक विभाग अहवाल
- विद्यार्थी विकास अहवाल
- Add on Courses
- आविष्कार स्पर्धा
- जिल्हास्तर आविष्कार स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांचे सत्कार
- रूक्मिणी-नारायण बेडसे पारितोषिक
- Sexual Harrashment Cell
- Anti Ragging Cell
- ऑनलाईन आंतरराष्ट्रीय योगा दिवस
- ऑनलाईन Quiz
- जागतिक महिला दिन ८ मार्च २०२० - माझी आई माझे महाविद्यालय
- शिष्यवृत्ती विभाग अहवाल
- JM Sethia Merit Scholarship
- माजी विद्यार्थी संघ अहवाल
- स्वच्छता पंधरवाडा
- विद्यार्थी विकास मंच स्पर्धा परीक्षा अहवाल
- Online Webinar Report
- Digital Literacy Certificate Programme
- Participated in National Institutional Ranking Framework (NIRF) - २०२०
- Conducted Online Quiz on Awareness of Viruses Diseases
- **वैयक्तिक अहवाल -** प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार
- **वैयक्तिक अहवाल -** प्रा. अजयबराव इंगळे
- **वैयक्तिक अहवाल -** डॉ. प्रियंका सुलाखे
- **वैयक्तिक अहवाल -** प्रा. आतिष मेश्राम
- आर्थिक दुर्बल घटक योजना
- वार्षिक निकाल
- बक्षिसपात्र विद्यार्थ्यांची यादी
- विविध शैक्षणिक समित्या
- प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी वृंद यादी

# आदिवासी जननायक बिरसा मुंडा



भारतीय स्वातंत्र्य लढ्यात आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. त्यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहतु खेडेगावात सुगमा मुंडा आणि करमी हातु या दाम्पत्याच्या पोटी झाला. याच बालकाने लढवय्या वृत्तीने आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून जे महान कार्य केले त्याला तोड नाही. त्यामुळेच बिरसा मुंडा यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला.

त्यांचे वडील शेतमजुर होते. घरच्या गरिबीमुळे त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्लिश शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. परंतु त्यांना भारतीय संस्कृतीचा मनस्वी अभिमान होता व तो त्यांनी निरंतर जपला. नैतिक आचरणाची शुद्धता व एकेश्वराचा त्यांना पुरस्कार केला. ब्रिटीशांच्या राजवटीमध्ये आदिवासींच्या वनस्पतींवर असलेल्या अधिकारावर बाधा येण्यास सुरूवात केली. तो रोखण्याकरिता आदिवासींनी न्यायालयात याचिका दाखल केली व आदिवासींचे वनधिकार पुनर्स्थापित करण्याची मागणी केली. परंतु सरकारने ती फेटाळल्यामुळे आदिवासी समाजात प्रचंड रोष निर्माण झाला.

सन १८९४ मध्ये बिहार राज्यात भिषण दुष्काळ पडला होता. या दुष्काळामध्ये उपासमारी व महामारीने अनेक लोक मृत पावले. त्यावेळी त्यांनी गरिब आदिवासी समाजाची निःस्वार्थी अंतःकरणाने अवाजवी शेतसारा माफ करून दुष्काळावर मात करण्याकरिता त्यांनी जनआंदोलन केले. हे आंदोलन जहागिरदार त्यांच्या त्यामुळे सामाजिक संतुलन बिघडून शांतता निर्माण होत असल्यामुळे ब्रिटीशांनी जहागिरदार व जमीनदारांच्या माध्यमातून बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८९५ मध्ये बिरसा मुंडा यांना दोन वर्षाचा कारावास झाला. त्यांना हजारीबाग तुरूंगात पाठवले. त्यामुळे सरकारविरूद्ध असंतोष वाढत गेला व ब्रिटीश सत्ता उखडून टाकण्याचा संकल्प त्यांनी केला. दोन वर्षांचा सश्रम कारावास उपभोगुन परत आल्यानंतर व आर्थिक प्रगतीसाठी राजकीय स्वातंत्र्याची आवश्यकता त्यांनी ओळखली. त्यासाठी संपूर्ण आदिवासी समाजाला संघटीत करण्यासाठी प्रयत्न करून त्यांनी ब्रिटीश सरकारविरूद्ध मार्गदर्शन करीत असताना ब्रिटीश सैन्याने हल्ला चढविला व त्या स्वातंत्र्यलढा पुकारला. सन १८९७ नंतर बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटीश सरकार विरूद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. त्यांनी पारंपरिक साहाय्याने डोंगराळ भागातुन हल्ले चढवले. ब्रिटीश सरकारकडे होती तरीदेखील १८९७ मध्ये नांगा नदिच्या काठावर बिरसा मुंडा यांनी ब्रिटीश सैन्याला नामोहरम केले. नंतर अतिरिक्त नेत्यांना रोखण्यात यश मिळवले. सुमारे ४०० आदिवासी शहीद झाले. सन १९०० मध्ये बिरसा मुंडा डोमबाडी पहाडांमध्ये आक्रोसी जनतेस मार्गदर्शन करीत असतांना ब्रिटीश सैन्याने हल्ला चढविला व त्या

ठिकाणी भीषण लढाई झाली. त्यांना चक्रचरपूर येथे बंदी करून त्यांची कारागृहाची यांची रवानगी करण्यात आली. त्याठिकाणी त्यांच्यावर अनन्वित अत्याचार करण्यात आले व त्याठिकाणी ९ जून १९०० मध्ये त्यांचे निधन झाले.

आपल्या २५ वर्षांच्या अल्पजीवन कालावधीमध्ये त्यांनी आदिवासींमध्ये स्वदेशी व भारतीय संस्कृतीच्या प्रती जी प्रेरणा जागवली ती अतुलनीय आहे. आज सुद्धा झारखंड, बिहार, ओरिसा, पश्चिम बंगाल, मध्यप्रदेश मधील आदिवासी समाज बिरसा मुंडा यांना आपले आद्यदैवत मानतो. बिरसा मुंडा यांनी त्रिस्तरीय पद्धतीने समाजाच्या उन्नतीसाठी कार्य केले. आदिवासी समाजाच्या शोषणामुळे परकीय राजकीय व्यवस्थेत असल्या बाब बिरसा मुंडा यांनी ओळखून त्याविरूद्ध आदिवासी समाजास संघटीत करून ब्रिटीश सत्तेविरूद्ध वेळोवेळी आंदोलन पुकारले. आदिवासी समाजाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी त्यांनी प्रचलित असलेल्या जमीनदारी व जहागिरदारी पद्धतीविरूद्ध लढा पुकारला.

कुठलाही समाज किंवा देश प्रबोधनारीवाय खऱ्या अर्थाने प्रगत तसेच क्रियाशील होत नाही. याची जाणीव बिरसा मुंडा यांना त्या काळी होतीच. त्यामुळे शिक्षण, स्वच्छता आणि अंधश्रद्धा निर्मुलन यावर विशेष भर देऊन त्यांनी समाज प्रबोधन केले. याचाच परिणाम म्हणून आदिवासी जनजमातीने शिक्षण, स्वच्छता यांचा मोठ्या प्रमाणात अंगीकार केला आहे.

**कु. अश्विनी युवराज पवार**
**टी.वाय.बी.ए. (समाजशास्त्र विभाग)**

*****

# मेळघाटातील स्वामिनी



डोंगर टेकड्यातील घाटांचा मेळ ज्या अरण्यात झाला आहे त्याला मेळघाट असे म्हणतात. मेळघाटाला प्राचीन व नैसर्गिक इतिहास आहे. विराटाय विराटनगर याच असण्यात होते. किचकाला भीमाने याच मेळघाटातच यमसदनी पाठवले. विराटाचा अपभ्रंश होऊन बनलं वैराट. हे आजही मेळघाट अरण्य क्षेत्रात आहे. किचकाच्या नावावरून किचकदारा व पुढे चिखलदरा झाले. हे गाव उंच टेकडीवर वसलेले आहे.

कोकरू हे कोतशियन वंशाचे असून ते स्वतःला रावणाचे वंशज समजतात. येथे गवळी, कोरकु, निघल, गोंड, भिल्ल, बुरूड, रठिया (भिलाला), मेंधिया व बलाई आदी जाती-जमाती आहेत. यापैकी ३४ टक्के लोकसंख्या कोरकु आदिवासींची आहे.

मध्यप्रदेश राज्याला लागुन असलेल्या चिखलदरा व धरणी असे दोन तालुके मिळून बनलेला हा परिसर ड्राय फॉरेस्ट म्हणून ओळखला जातो. मेळघाटचे भौगोलिक क्षेत्र ४००४१ चौरस मीटर आहे.य इरामाता (धरणीमाता) व डोंगर (गोमेन) यांना मानणारा हा कोरकु यांची मेघनाथ (रावणपुत्र) व मंठुबा ही दैवते आहेत.

- **कोरकु स्त्री -**

कोरकु स्त्री ही हळदी पिवळी रंग किंवा सावळया वर्णाची असते. ती बारीक काठाची गोल सुती साडी घालते. उलटा पदर घेऊन ती डोक्यावर घेते.

भूत-खेत लागु नये म्हणून जागोजागी गोंदलेले असते. या स्त्रिया रूप्याचे कयलाये व चांदीचे दागिने घालतात. पायातले गुधभगुडी (तोडा किंवा कडे), गळ्यातली साखळी, मुचकट (साखळी), पायातले पैंजण, सतरा, पायळी, मुंडी, कडा, बिगळी, दिगडी, साकडी (कमरपट्टा) कवड्याच्या, पोवळ्याच्या माळा काचमाळा, वाकी, दंडोळ्या हे त्यांचे दागिने कपाळ हात यावर हिरवागार गोंदण. कधी तुळशी वृंदावन तर कधी पतीचे, बापाचे, कधी भावाचे नाव गोंदवलेले असते. गळ्यात चांदीच्या साखळ्या कलदार चांदीच्या रूपयाला अंगळ्या जोडून त्या पाचही बोटात घालतात. त्याला छल्ले म्हणतात. पायात कडे, तोडे, काळ्या मण्याच्या माळ, कानात चांदीचे झुमके, नाकात लाल मण्यांची गोल नयनी असि तिचे रूप असते. घरातील माती कुडाच्या वा शेणाने सारवलेल्या भिंतीवर आरसा बसवलेला असतो. त्यात पाहून कोरकु स्त्री आपली वेणी-कणी करते. कोरकुंमध्ये मुलामुलींचे लग्न ठरले की मोहाचा मध पितात त्या धुंदीत नाच-गाणं करतात. लग्नात मुलीच्या वडिलांना धान्य, बकरी, गाय द्यावे लागते. याला गनिम ((टुडा) म्हणतात. लग्न मंडपात लाकडी खांब रोवतात. नवरा मुलगा हा वधुपित्याकडे लमजाना सांसऱ्यावर भरपूर कर्ज पळ काढतात.

भुमिका (मांत्रिक) हा त्यांचा प्रमुख सल्लागार असतो. भूमिकाच्या सल्ल्याशिवाय कोरकू पुढे जात नाहीत. जादुटोणा, अंगारे, धुपारे, ताईत या अंधश्रद्धेच्या विळख्यातून हे सुटलेले नाहीत. कोरकू मुलीचे लग्न लहान वयातच होते. खाण्या-पिण्याची हेळसांड, जीवनसत्वाचा अभाव, गरिबी, अज्ञान यामुळे जन्माला येणारे मुल कुपोषित असते. कुपोषण हा मेळघाट समोरील सर्वात मोठा प्रश्न आहे. शासनाने यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. दुर्गम भागात प्रसुती केंद्र नाहीत. म्हणून मोबाईल व्हॅनची व्यवस्था केली आहे. त्यात प्रसुतीसाठी लागणाऱ्या सर्व सुविधा व स्त्रीतज्ञ असतात. कायद्यानुसार १८ वर्षापेक्षा कमी वय असलेल्या विवाहितेची कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करता येत नाही. पण या वयापर्यंत कोरकू स्त्रीला ३ ते ५ मुले झालेली असतात. २६ ते ३० वर्षाच्या आजी झालेल्या स्त्रिया फारशा शोधाव्या लागत नाहीत. ११ ते २७ अपत्ये असलेली कुटुंब दखील सहज पहायला मिळतात.

**कु. लक्ष्मी गोकुळ गवळे**

**टी.वाय.बी.ए. (समाजशास्त्र विभाग)**

*****

## पर्यावरण व्यवस्थापन



मानवी कृतींमुळे पर्यावरणाची घटलेली गुणवत्ता वाढविणे व पर्यावरणाची स्थिती सुधारणे या ध्येयांसाठी जाणीवपूर्वक केलेली कृती. पर्यावरणाच्या अवनतीमुळे सर्व सजीवांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे पर्यावरणतज्ज्ञ, अभ्यासक, शासक, प्रशासक, सामाजिक तसेच राजकीय कार्यकर्ते या समस्यांवर विचारविनिमय करीत आहेत. त्यातूनच पर्यावरण व्यवस्थापन ही संकल्पना पुढे आली आहे. पर्यावरण व्यवस्थापन ही विकास व नियोजनाच्या संदर्भातील संकल्पना आहे. यात समाजाचा सर्वांगीण विकास करणे तसेच नैसर्गिक संसाधनांचा समतोल वापर करून सामाजिक व आर्थिक विषमता दूर करणे,

ही उद्दिष्टे अभिप्रेत आहेत. त्याचबरोबर मानवाच्या अविचारी कृतींवर नियंत्रण, नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण व पर्यावरणीय समस्यांच्या निवारणासाठी निर्धारित केलेली तत्त्वे यांचा पर्यावरण व्यवस्थापनात समावेश होतो. मानवाच्या सामाजिक व आर्थिक विकासाबरोबर पर्यावरणाची गुणवत्ता राखण्याचा प्रयत्न यातून केला जातो.

पर्यावरण व्यवस्थापन ही मानव आणि निसर्ग यांच्यात समन्वय साधणारी प्रक्रिया आहे. त्याद्वारे पर्यावरणाचे संतुलन बिघडू न देता व प्रदूषणविरहित पर्यावरण राखून मानवाचे हित साधण्याचा प्रयत्न केला जातो. पर्यावरणाच्या आपत्तीवर नियंत्रण ठेवण्याची प्रक्रिया ही पर्यावरण व्यवस्थापनाचे एक अंग असून यात नियोजन, विश्लेषण व मूल्यांकन यांच्या आधारे संसाधनांचा विचारपूर्वक उपयोग करण्याचे तंत्र वापरले जाते.

पर्यावरणाचे व्यवस्थापन विशिष्ट प्रदेश किंवा राष्ट्र यांच्याशी मर्यादित नसून ती संपूर्ण जगांची गरज आहे. भविष्यात मानवी समाजाच्या समन्यायक्षम उपयोगासाठी परिसंस्थांचे रक्षण करणे व परिसंस्थांतील अखंडत्व राखणे हे पर्यावरण व्यवस्थापनाचे ध्येय आहे.

- **पर्यावरण व्यवस्थापनाची उद्दिष्टे :**

(१) पर्यावरणातील निरनिराळ्या घटकांचे संशोधन करणे. (२) पर्यावरणाच्या नियोजनाची रूपरेषा तयार करणे. (३) पर्यावरणाच्या विविध घटकांना प्रदूषणमुक्त ठेवणे. (४) मानवाला प्रदूषणाच्या परिणामांपासून वाचविणे. (५) अवक्षय होत असलेल्या सजीवांना संरक्षण देणे. (६) पर्यावरणाचा दर्जा राखला जावा म्हणून विशिष्ट नियमावली वा तत्त्वे ठरविणे. प्रदूषण नियंत्रणाद्वारे पर्यावरणाच्या गुणवत्तेचे रक्षण करणे. (७) व्यवस्थापनासाठी उपायांचे समीक्षण करणे व त्यात सुधारणा करणे. (८) व्यवस्थापनासाठी नियोजित केलेल्या उपायांच्या परिणामांची तपासणी करणे. (९) पर्यावरण व्यवस्थापनासाठी साहित्यसंग्रह करणे. (१०) पर्यावरण शिक्षण देण्याची व्यवस्था करणे आणि समाजात जाणीव व जागृती निर्माण करणे. (११) संसाधनांचा बहुउद्देशीय वापर करून पारिस्थितिकीय संतुलन राखण्याचा प्रयत्न करणे. (१२) जैवविविधतेचे परिरक्षण करणे. (१३) स्वच्छ तंत्रज्ञान उत्पादन संकल्पना स्वीकारणे. (१४) पर्यावरण संधारणासाठी नियम व कायदे करून त्यांची अंमलबजावणी करणे.

- **पर्यावरण व्यवस्थापनाचे धोरण :**

हे ठरविताना खालील घटकांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक असते. (१) पर्यावरणीय अवनती टाळण्यासाठी हवा प्रदूषण, जलप्रदूषण व भूमिप्रदूषण यांवर प्रभावीपणे नियंत्रण आणणे व कार्यक्षम उपाय योजणे. (२) ऊर्जा संसाधनांसह इतर सर्व संसाधनांचा अतिवापर टाळणे व टाकाऊ पदार्थांची कमीत कमी निर्मिती व्हावी यासाठी कमी खर्चिक परंतु कार्यक्षम तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे. (३) शाश्वत विकासासाठी उत्पादन निर्मितीकरिता स्वच्छ तंत्रज्ञानाचा वापर करणे. (४) शाश्वत विकासासाठी पर्यावरण प्रभाव मूल्यांकन तपासणी, पर्यावरण व्यवस्थापन पद्धती, पर्यावरण जोखीम मूल्यमापन इत्यादी साधनांचा स्वीकार करणे. (५) व्यापक स्तरावर पर्यावरणीय जगजागृती व्हावी यासाठी प्रोत्साहन देणे आणि शिक्षणाच्या माध्यमातून पर्यावरण समस्यांची समाजात जागृती निर्माण व्हावी म्हणून विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे. (६) शैक्षणिक स्तरावर पर्यावरण शिक्षण व प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे. (७) लोकसंख्या वाढीस प्रतिबंध व्हावा यासाठी योजना आखणे. (८) सामाजिक समन्याय व्यवस्था प्रस्थापित होण्यासाठी प्रयत्न करणे.

- **पर्यावरणाच्या प्रमुख घटकांचे व्यवस्थापन :**

पर्यावरण हे जैविक तसेच अजैविक घटकांपासून बनलेले असते. असे व्यवस्थापन अत्यंत गरजेचे आहे. पर्यावरणातील काही प्रमुख घटक

पुढीलप्रमाणे आहेत : (१) वन व्यवस्थापन, (२) वन्यजीव व्यवस्थापन, (३) मृदा व्यवस्थापन, (४) जल संसाधनांचे व्यवस्थापन, (५) खनिज संसाधनांचे व्यवस्थापन, (६) ऊर्जा संसाधनांचे व्यवस्थापन. याशिवाय पर्यावरण व्यवस्थापनात प्रदूषण नियंत्रित करण्याला अधिक प्राधान्य दिले जाते. यास प्रदूषण नियंत्रण व्यवस्थापन असेही म्हणतात. यात (अ) वायुप्रदूषण नियंत्रण उपाय, (आ) मृदाप्रदूषण नियंत्रण उपाय, (इ) जलप्रदूषण नियंत्रण उपाय आणि (ई) अपशिष्ट पदार्थांचे व्यवस्थापन यांचा समावेश होतो.

**कु. माधुरी बोरसे**

**एस.वाय.बी.ए. (भूगोल विभाग)**

*****

# पर्यावरण शिक्षण



पर्यावरण व त्यातील घटक, त्यांच्या समस्या इत्यादीविषयी समाजजागृतीसाठीचे शिक्षण म्हणजे पर्यावरण शिक्षण होय. पर्यावरण शिक्षण या संकल्पनेचा उगम सामाजिक आणि राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय गरजांमधून झाला. पर्यावरण अभ्यास या ज्ञानशाखेचा हा नवा उपक्रम आहे. पर्यावरण संधारण हे आजच्या काळातील सर्वांत मोठे आव्हान आहे. पर्यावरणाची गुणवत्ता दिवसेंदिवस ढासळत आहे. वाढती लोकसंख्या, वाढते औद्योगिकीकरण, बदललेली उपभोक्तावादाकडे झुकणारी जीवनशैली, नैसर्गिक साधनांचा मर्यादेबाहेर उपयोग व मनुष्याची बेफिकीर वृत्ती यांमुळे होणारे जल, वायू, ध्वनी, अंतराळ व भूमी इत्यादींचे प्रदुषण आणि इतर अनेक पर्यावरणीय समस्या यांनी जगभर गंभीर स्वरूप धारण केले आहे. त्यामुळे सजीवांचे व पर्यायाने मानवाचे अस्तित्व धोक्यात आले आहे. पर्यावरणाच्या संरचनेचे, स्वरूपाचे आणि त्याच्या विविध घटकांचे ज्ञान देऊन प्रत्येक व्यक्तीस एक जागरूक व जबाबदार नागरिक बनविणे गरजेचे झाले आहे. आजचा विद्यार्थी उद्याचा नागरिक आहे, म्हणूनच शिक्षणाच्या सर्व स्तरांवर आज पर्यावरण शिक्षण दिले जात आहे.

पर्यावरण अभ्यासात मनुष्यास आणि त्याच्या परिसरास उपयुक्त ठरेल अशा सर्व प्रकारच्या ज्ञानाचा समावेश केला जातो. मानवी जीवनाची गुणवत्ता आणि त्याचे अस्तित्व कायम राखण्याकरिता आवश्यक त्या उपाययोजना जाणीवपूर्वक राबविण्याची क्षमता नागरिकांमध्ये विद्यार्थी अवस्थेपासून निर्माण करणे, हे पर्यावरण शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

पर्यावरण शिक्षणामुळे अध्ययनकर्ता पर्यावरणाच्या क्षेत्रातील समस्या व आव्हानांचे स्वरूप समजून घेऊन त्यांचा यशस्वीपणे सामना करण्यासाठी आवश्यक कौशल्य आत्मसात करू शकतो. तसेच पर्यावरण शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयक सकारात्मक अभिवृत्तींचा, मूल्यांचा व पर्यावरण नैतिकतेचा विकास होईल व त्यांना शाश्वत विकासासाठी आवश्यक पर्यावरणसंगत कृती करण्याची अभिप्रेरणा मिळेल अशी अपेक्षा केली जाते. पर्यावरण शिक्षणात खालील घटकांवर अधिक भर दिला आहे.

(१) पर्यावरण व पर्यावरणीय आव्हाने यांविषयी संवेदनशीलता व जाणीव.

(२) पर्यावरण व पर्यावरणाची आव्हाने यांविषयीचे आकलन व ज्ञान.

(३) पर्यावरणीय गुणवत्ता टिकविण्यासाठीची मदत व त्यासंबंधीच्या वृत्तीत वाढ.

(४) पर्यावरणीय समस्या कमी करण्यासाठीचे कौशल्य.

(५) पर्यावरणीय कार्यक्रमांत उपलब्ध ज्ञानाचा वापर व सहभाग.


पर्यावरण शिक्षणाच्या व्यापक संज्ञेत पर्यावरणाविषयी लोकजागृती, लोकशिक्षण, माहिती व तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे, छापील माहिती इत्यादींचा समावेश होतो. पर्यावरण शिक्षण हे पारंपरिक तसेच अपारंपरिक शिक्षण आहे. यात बाह्यशिक्षण व प्रायोगिक शिक्षण या पद्धतींचा उपयोग कला जातो. पर्यावरणीय घटक व समस्या याबाबतीतील आधुनिक विचारप्रणाली व कार्यक्षम दृष्टिकोन विद्यार्थ्यांसह समाजातील सर्व घटकांत रुजविणे हे पर्यावरण शिक्षणाचे ध्येय आहे. निसर्गाविषयी कृतज्ञता, संसाधनांचे संधारण, शाश्वत विकास आणि परिस्थितिकीय संतुलन यांसाठी पर्यावरण शिक्षणाची नितांत गरज आहे.

**पवन ठाकरे**

**एस.वाय.बी.ए. (भूगोल विभाग)**

*****

## म. गांधींचे विचार : दहशतवादावर उपाय



२१ व्या शतकात असतांना भारतीयांनी स्पर्धेपेक्षा सहकार्याची भावना असलेला दृष्टीकोन संपूर्ण विश्वातील विचारवंतांवर छाप टाकत आहे. योग व आयुर्वेद या भारतीय पद्धतींची पाश्चिमात्य देशातील वाढती लोकप्रियता म्हणजे मानवी संस्कृतीचे भारतीय बंधुत्ववाद होय. परंतु आज मागे वळून पाहतांना माझ्या सारख्या सामान्य माणसाला निराशेने ग्रासले आहे. श्रद्धा, ध्येय, जीवनमूल्य यांच्यावर जात, पात, पंथ, धर्म, राज्य यांच्यात केवळ दुरावा निर्माण झाला आहे, असे नाही. तर त्यांच्यात परस्पर अविश्वासाची भावना वाढली आहे आणि स्पर्धेच्या राजकारणाला अवास्तव महत्त्व दिले गेल्याने या दुराव्याला खतपाणीच घातले जात आहे आणि त्यामुळेच या दोन्ही काळांच्या सीमेवर वावरणाऱ्या माणसाच्या मनात काहुर दाटले आहे. संपूर्ण स्वातंत्र्य लढ्यातील कुठलीही घटना बघितली तरी लक्षात येते की, गांधीजींनी त्यांचं म्हणणं कधीही सोडलं नाही. पण ते कधीही आक्रमक झाले नाहीत. कारण त्यांचा त्यांच्या विचारांवर ठाम विश्वास होता. स्वतःला काय हवं आहे याची त्यांना पूर्ण कल्पना होती. त्याचे ध्येय सकारात्मक होते आणि त्या ध्येयांच्या दिशेने जाण्यासाठी लागणारा अथक ठामपणा त्यांच्याकडे होता.

गांधीजींच्या हत्येनंतर आपली प्रतिक्रिया देतांना अल्बर्ट आइन्स्टाइन म्हणाले होते की, या भुतलावर असा एक माणूस होऊन गेला असे पुढील पिढ्यांना सांगितले तर त्यावर विश्वास बसणार नाही. गांधीजींमध्ये अलौकीक असे काय होते की आज देखिल त्यांच्या नावाचा महिमा टिकून आहे. अनेक पुढारी आले आणि गेले परंतु कोणीही गांधींसारखा असा आधुनिक इतिहासाच्या मानसिकतेवर इतक्या ठळकपणे उमटू शकला नाही. स्वातंत्र्य लढ्याच्या रणांगणावर येऊन उभे राहिले तेव्हा जगात वाढता प्रभाव हिंसेचा होता. काहींना हिटलर बद्दल आकर्षण होते तर काहींना स्टॅलिनबद्दल, काहींना स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल तर काहींना सुभाषचंद्र बोसस यांच्याबद्दल परंतु या वातावरणात सत्याग्रह आणि अहिंसा ही शस्त्रे घेऊन ब्रिटिश साम्राज्याला आव्हान देण्याचा वेडेपणा सुचणाऱ्या गांधीजींच्या चरित्राचा वेध कसा घेणार? गांधीजींनी असे लाखो वेडे तयार केले. स्वतःला सर्वात शहाणे

समजणाऱ्या ब्रिटिश राज्यकर्त्यांना या वेड्या फकीराशी सामना करणे अशक्य होऊ लागले.

गांधीजींना ज्या प्रकारचा समाज अभिप्रेत होता त्यातले आज येथे जवळपास काहीच शिल्लक राहीले नाही. असे की, ज्या समाजाची संकल्पना त्यांनी केली होती त्याचे समग्र स्वरूप त्यांनी तपशिलाने मांडले होते असेही नाही. विशिष्ट प्रकारची समाज रचना कशी असावी यासाठी गांधींकडे आपण वळतो. नाही तरी माणूस कसा असावा यासाठी त्याचे विचार समजून घेणे उपयुक्त ठरेल.

गांधी विचार आजच्या काळात उपयोगात नव्हे तर या विचारांशिवाय जगाला पर्याय नाही. नव्या युगाने निर्माण केलेल्या वेगवेगळ्या समस्यांवर गांधी विचार हेच उत्तर आहे. न्युयॉर्कमधील वर्ल्ड ट्रेड सेंटर दहशतवादी हल्ल्याचे लक्ष ठरले. सर्वोच्च पदाची सामर्थ्याची जाणीव असलेल्या अमेरीकेसारखा समृद्ध देश या हल्ल्याने खचून गेला. सर्व सत्ताधिश अमेरिकेचे सार्वभौमत्व, सुरक्षा यंत्रणा राखू शकत नाही. ही धक्कादायक बाब त्यावेळेस समोर आली. जीवावर उदार होऊन तरूण, निष्पापांचे बळी घेत होते. आत्मघातालाही तयार असलेल्या तरूणांच्या फौजा जगासमोरच्या आव्हान झाल्य. तरूणांच्या अशा विघातक प्रेररणांना बदलविण्यास आवश्यक असलेले बळ फक्त गांधी विचारात असल्याने जगाला तेव्हा लक्षात आले. मोठ्यात मोठा ॲटमबॉम्बही मन परिवर्तन करण्यात कुचकामी ठरतो. हे प्रश्न हिंसेने सुटत नाही. तर गांधीजींच्या अहिंसेच्या मार्गाने सुटू शकतात. हेही जगाला या निमित्ताने कळले. गांधी विचार सर्वश्रेष्ठ आहेत. हे समोर आणण्याच्या चळवळी सुरू झाल्या. युवक मोठ्या प्रमाणावर समोर आहे. We want peace not war हा या युवकांच्या चळवळीचा मंत्र होता.

कौटुंबिक पातळीवर अस्वस्थता निर्माण करणारी आणखी एक दुर्घटना अमेरिकेत घडली. तेथे बंदुक चालविण्यासाठी परवाना आवश्यक नाही. एका गृहस्थाने घरी आणलेले पिस्तोल त्याच्या अकरा वर्षाच्या मुलाने शाळेत नेले आणि संताप आल्याचे निमित्त घेऊन एकोणावीस मुलांवर ते चालविले. अकरा वर्षांचा मुलगा एकोणावीस जणांचे खून करू शकतो. हा प्रकार धक्कादायक होता. म्हणून अमेरिकेत मदर्स डे च्या निमित्ताने एक लाखांवर महिला एकत्र आल्या आणि निरागस मुलांना मारायला शिकवणाऱ्या शस्त्राचा व्यापारर बंद करा असा आग्रह धरू लागल्या. हिंसेला घाबरलेल्या जगाला कोवळ्या मुलांनी हिंस्त्र होण्याचा प्रचंड हादरा बसला होता.

अहिंसेचा मार्ग स्विकारणे हे गांधीजींनी दिलेले विचारधन आहे. युद्ध कोणालाच नको आहे. कोणत्याही देशाची अर्थव्यवस्था युद्धाचा खर्च सोसू शकणार नाही. त्यासाठी समाजाने शांतीचे आचरण करणे गरजेचे आहे. जगातील अनेक चळवळीची पाऊले त्या दिशेने वळत आहेत. उदा. फ्रान्समध्ये शिक्षण पद्धतीत बदल करावा म्हणून युवकांनी आंदोलन केले. अभ्यासक्रम बदला ही त्यांची मागणी त्यांनी अपेक्षित बदल झाले नाहीत. म्हणून महाविद्यालयातच जायचे नाही असा निर्णय युवकांनी घेतला. युवकांची भूमिका समजुन घेण्यासाठी चर्चा सुरू झाल्या.

बराक ओबामांचा राजकीय क्षितीजावर उदय झाला होता. काळ्या वर्णाचे ओबामा गांधी विचारांमुळेच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले. माणूस तेवढा एक आहे. हे गांधीजींचे तत्त्व गांधीजी हे नव्या जगाचे रोल मॉडेल असल्याने बराक ओबामा यांनी जाहीर केले. जगाचे आपला मानलेला गांधी विचार हा आजही भारताच्या प्रगतीचा मार्ग आहे.

**कु. पुनम सुनिल जगदाळे**
**एस.वाय.बी.ए. (राज्यशास्त्र विभाग)**

*****

# लोकशाही पुढील आव्हान - राजकारणाचे गुन्हेगारीकरण



लोकशाही हा शब्द सर्वांच्या परिचयाचा आहे. कारण आज जगातील सर्व प्रगत देशांमध्ये लोकशाही शासन पद्धतीचा अवलंब केलेला दिसतो. प्राचीन ग्रीन देशात लोकशाही शासन होते. काही शास्त्रज्ञांनी लोकशाही म्हणजे बहुमताचा निर्णय अवलंब करणारी शासन पद्धती आहे, असे मानले आहे. तर काहींच्या मते आर्थिक प्राप्तीसाठी लोकांना समान संधी देणारी शासन पद्धती म्हणजे लोकशाही होय. लोकशाही म्हणजे समानता अशी व्याख्या काही विचारवंत करतात. अशा रितीने लोकशाही या शब्दाविषयी व शासनविषयी अनेक मते आणि मतांतरे आपणास दिसून येतात.

- **भारतीय लोकशाही -**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. विविध देशातील राज्यघटनांचा अभ्यास करून भारतीय राज्यघटना तयार करण्यात आली. कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ व न्याय मंडळ ही भारतीय लोकशाहीची आधारस्तंभ आहेत. २६ जानेवारी १९५० या दिवशी भारतीय जनतेने भारतीयांसाठी निर्माण केलेली राज्यघटना लागु केली. त्याचबरोबर येथे संसदिय व्यवस्थेचा स्विकार होऊन विभिन्न लोकशाही संस्थांद्वारे राज्यकारभारास सुरूवात झाली. आज ७३ वर्षांनंतर सुद्धा भारतीय लोकशाही व्यवस्था म्हणून भारतीय राष्ट्र उभे राहिले आहे काय? आज भारतीय लोकशाहीला अनेक आव्हानांना तोंड देऊन खडतर प्रवास करावा लागत आहे. म्हणून राजकीय गुन्हेगारी या भारतीय लोकशाहीला भेडसावणाऱ्या आव्हानाचा काय परिणाम झाला हा शोध निबंधाचा मुख्य विषय आहे.

- **भारतीय लोकशाही आणि राजकीय गुन्हेगारी -**

भारतात निवडणुका अती खर्चिक होत गेल्या तसतसे काळ्या पैशांचे निवडणूक प्रक्रियेतील प्रस्थ वाढत आहे. राजकीय पक्षांना कोण किती पैसे देते हे बाहेर कधीच समजत नाही. राजकीय पक्षांनी खर्चाची दिलेली विवरणपत्रे कधी खरी नसतात. स्टीफन कोचानेक या लेखकाने भारतीय राजकारणाचे वर्णन "ब्रिफकेस पॉलिटिक्स" असे केले आहे. त्यानंतर ब्रिफकेसची जागा सुटकेसने घेतली. पुढे तर चक्क पेटी, खोका या भाषेतच आर्थिक व्यवहार केले जाऊ लागले. सगळाच व्यवहार चोरीचा असल्यामुळे या अमाप पैशांची कुठे नोंद व पोचपावती हिशोब असण्याची शक्यता नसते. तस्कर, गुन्हेगार, बिल्डर अशा असामाजिक घटकांचे यातुन आयतेच फावते. निवडणूक प्रक्रियेत वाढलेला हिंसाचार हा सुद्धा गुन्हेगारांना राजकारणात उथळ माथ्याने वावरण्याची संधी देण्यास कारणीभूत झाला आहे. शांततामय पद्धतीने समांतर घडवून आणण्याचे मार्ग असे लोकशाहीतील मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडणाऱ्या निवडणुकांचे वर्णन केले जाते. प्रत्यक्षात मात्र मतदारांना धाक दाखविणे, उमेदवार पळविणे, ठार मारणे, डांबून ठेवणे, हुल्लडबाजी करून प्रतिस्पर्धीचा प्रचार अशक्य करणे, खोटे मतदान करणे, मतदान केंद्रे बळकावणे, मतपेट्या पळविणे अशा प्रकारचे प्रमाण निवडणुकांमध्ये वाढत चाललेले दिसतात. राजकारण हा अनेकांचा पुर्ण वेळेचा व्यवसाय बनलेला आहे. निवडणूक जिंकण्यासाठी पक्षांमध्ये आणि उमेदवारांमध्ये होणारी स्पर्धा आता जीवघेणी बनत

चालली आहे. प्राणघातक हल्ला होण्याच्या भीतीने उमेदवारांमधील बडे बडे स्वसंरक्षणासाठी, अंग रक्षणासाठी अंग रक्षकांचा ताफा बाळगतात. त्यांनी पोसलेल्या गुंडांच्या टोळ्या मतदानाच्या दिवशी मोकाट सुटतात. बिहार मधील रणवीर सेनेने गेली काही वर्षे असाच धुमाकुळ घातला होता. (लोकसभा निवडणुका १९५२, १९९४, १९९९) निष्ठुरपणे सत्तेचे राजकारण खेलणारे नेते विरोधकाला कायम संपविण्यासाठी भाडोत्री गुंडांना हाताशी धरतात. त्यांचे गुन्हे पाठीशी घालतात. तरीही अनेकदा हे गुंड आपल्या आश्रयदात्यांवरही उलटतात. राजकारणाचे असे गुन्हेगारीकरण होत आहे.

राजकारण हे विकासाचे साधन न बनता पैसा आणि प्रतिष्ठा कमविण्याचे साधन बनले. त्यामुळे राजकारणाचे गुन्हेगारीकरण वाढले. साधारणतः १९७७ नंतर ही प्रक्रिया गतीने वाढत गेली. असे अनेक राजकीय निरीक्षक सांगतात. त्यामुळे असे गुन्हेगार अधिक आत्मविश्वास पुर्वक राजकारणामध्ये उजळ माथ्याने वावरतात. पडद्याच्या आड राहून राजकीय पक्षांना मदत करणारे सराईत गुन्हेगार आता आमदार, खासदार बनून लोकांचे प्रतिनिधीत्वव करू लागले आहेत. बिल्डर, पैसा, गुंड आणि माफिया हे आजचे भारतीय राजकारणात नियंत्रण करीत आहेत. त्यामुळे संसदेमधील राजकीय निर्णय घेण्याची प्रक्रिया व कार्यपद्धती प्रभावीत करण्याचे नैतिक व सभ्य मार्ग कुचकामी ठरतात असे आपणास सहजपणे म्हणता येईल. मनी, मसल आणि माफिया हे तीन प्रकार आजचे भारतीय राजकारण नियंत्रित करीत आहेत. गणेशोत्सव असो कि आणखी कोणताही सार्वजनिक कार्यक्रम असो. वसुलीची जबाबदारी गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्यांवरच सोपविली जाते. त्यांच्या दानशुरतेचे गोडवे झोपडपट्यांमधील त्यांनी पोसलेले दादा गात असतात. नाट्य, चित्रपट, क्रिडा, राजकारण इत्यादींपैकी कोणतेच क्षेत्र त्यांच्या प्रभावापासून मुक्त राहिले नाही. राज्यसत्ता त्यांना हात लाऊ शकत नाही आणि अपवाद प्रसंगी जरी त्यांना पकडून तुरूंगात ठेवले तरी त्यांची पंच तारांकीत हॉटेल सारखी व्यवस्था केली जाते. तुरूंगातून त्यांच्यापैकी काहींनी निवडणूक लढविल्या तरी ते निवडून येतात. आजच्या वर्तमान लोकसभेतील १५५ खासदार विविध प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये अडकले आहेत. ही गुन्हेगारी फक्त राजकीय क्षेत्रातच आहे असे नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचे सर्वच क्षेत्र आज गुन्हेगारीने व्यापले आहेत.

- **उपाय योजना -**

१) फुटीरतावादी वृत्ती, भ्रष्टाचार, दहशतवाद, गुन्हेगारी याला आळा घालण्यासाठी ठोस कायदे करणे.

२) गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या प्रतिनिधीला पदावरून काढण्याचा जनतेला अधिकार असावा.

३) गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीला मतदानाचा व निवडणुक लढविण्याचा अधिक असू नये.

४) गुन्हेगारांवरील खटले त्वरीत निकाली काढावेत.

५) निवडणूकीत उमेदवाराच्या पात्रतेच्या अटींचे पालन काटेकोरपणे झाले पाहिजे. जेणेकरून गुन्हेगार प्रवृत्तीच्या व्यक्ती राजकारणात येणार नाही.

- **निष्कर्ष -**


स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या राष्ट्रभक्तांच्या स्वप्नातला नवभारत अद्याप या देशातील संविधानिक शासन पद्धतीला साकार करता आलेला नाही हे खरे आहे. परंतु या पद्धतीने काळाची आव्हाने जशी समर्थपणे पेलली तशीच परिस्थितीनुसार बदलण्याची आपली लवचिकताही सिद्ध करणे गरजेचे आहे. कारण लोकशाही हा काही सुरक्षित ठेवा नाही. जो एकदा प्राप्त झाला की जपुन ठेवता येतो. लोकशाहीचा शोध हा एक निरंतर चालणारा संघर्ष आहे. आज सर्वच देशातील लोकशाहीसमोर अनेक गंभीर आव्हाने आहेत. ती आव्हाने समजून घेण्याची गरज आहे. कारण

लोकशाहीचा प्रयोग कोणत्याच क्षेत्रात पूर्णपणे फसलेला नाही. आज भारतीय लोकशाही कोणत्याच क्षेत्रात मागे नाही. हीच लोकशाहीची सफलता आहे. परंतु राजकारणाचे गुन्हेगारीकरण थांबविण्यासाठी जनतेने निवडणुक आयोगाचे आणि शासकीय पातळीवर काही प्रयत्न होणे गरजेचे आहे. तरच गुन्हेगार मुक्त राजकारणाची निर्मिती होईल. तेव्हाच खरी लोकशाही या देशात नांदेल.

**कु. मनिषा खंडू गवळे**
**एस.वाय.बी.ए. (राज्यशास्त्र विभाग)**

*****

# जीवाणू युद्ध



सजीव घटकांवर विपरीत परिणाम करणाऱ्या अस्त्रांना जीवशास्त्रीय अस्त्रे संबोधिले जाते. जेव्हा जैविक पदार्थांचा किंवा जीवाणूंचा उपयोग युध्दामध्ये शत्रूविनाशासाठी किंवा शत्रूसैनिकांना तात्पुरते हतबल करण्यासाठी केला जातो तेहा त्या युध्दास जीवाणू युध्द असे म्हणतात. जेव्हा जीवशास्त्रीय अस्त्राच्या उपयोगाने ज्या युध्दात मनुष्य, प्राणिमात्र, पिके किंवा अन्य आर्थिक साधन नष्ट करून रोगराई पसरविण्याचा प्रयोग केला जातो तेव्हा त्या युध्दाला 'जिवाणू युध्द' म्हटले जाते. त्या युध्दामध्ये औषधे, कुजके पदार्थ, मांस, रासायनिक द्रव्य, कीटाणू किंवा जीवजंतूचा उपयोग मोठ्या प्रमाणात केला जातो. त्यासाठी आधीच कच्चे किंवा कुजलेले मांस, दुग्धजन्य पदार्थ, सोयाबीन रस किंवा साखर कारखान्यातील शिल्लक पदार्थ एकत्र करून विषारी जीवजंतू तयार केले जातात. ते जीवजंतू शत्रूच्या राष्ट्रात पोहचविण्यासाठी सिगारेट, लायटर, पेन, पेन्सिल, पाण्याचे साठे इत्यादी माध्यमांचा उपयोग केला जातो. याशिवाय मोठया प्रमाणात उपयोग करण्यासाठी तोफगोळे, रॉकेट किंवा क्षेपणास्त्रे इत्यादींचा उपयोग केला जातो. या कार्यामुळे शत्रू सैनिक आजारी पडतात व त्यांचे मनोधैर्य संपते. अनेक प्रकारच्या संसर्गजन्य रोगांचा प्रसार होऊन शत्रूचे सैन्य क्षीण होते.

- **जिवाणू युध्दाचा इतिहास -**

जिवाणूंचा युध्दातील उपयोग तसा अगदीच नवीन नाही. सूक्ष्म जंतूंच्या अस्तित्वाची आणि त्यांच्या रोगोत्पादक सुप्त शक्तीची कल्पना येण्यापूर्वीपासूनच जैविक युध्दतंत्राची उपयुक्तता मनुष्याला जाणवली होती, असे इतिहासावरुन स्पष्ट होते. पटकी (कॉलरा) किंवा प्लेग या रोगामुळे मेलेल्यांची प्रेते तटबंदीबाहेर फेकून देऊन त्यामुळे वातावरणात रोगराई पसरविण्याची कल्पना जुनीच आहे. नेपोलियनने इटलीमधील मँटयूआ शहराला वेढा दिला होता. तेव्हा त्या शहराभोवती कृत्रिम दलदल तयार केली गेली होती. दलदलीमुळे हिवतापाचा प्रादुर्भाव वाढून नगरवासी इटालियन जर्जर होऊन शरण यावेत हा त्या मागचा उद्देश होता. अमेरिकेतील इंडियनांविरूद्ध झालेल्या युध्दात गोऱ्या वसाहतकारांनी देवीच्या रोगजंतूची दूषित केलेली गरम पांघरूणे इंडियनांना मुद्दाम देऊन तो रोग पसरविण्याची कल्पना योजण्यात आली होती.

प्राचीन साहित्य, धर्मग्रंथामध्ये सुध्दा जिवाणु युध्दतंत्राची कल्पना केली गेलेली आढळते. अथर्ववेदामध्ये राक्षसांनी सोडलेली रोगरूप आयुधे, अन्यत्र जाऊन पडो, अशी इंद्राला केलेली प्रार्थना आढळते. प्राचीन काळी ज्वाला, धूर आणि विषारी अनिष्ट वायू उपयोगात आणले गेले असावेत तसेच

विहिरी मध्ये विष कालवून शत्रूला मारण्याचे प्रयत्न होत असत असे रामायणातील उल्लेखात आढळते. ख्रिस्तपूर्व ४३१-४०४ या काळामध्ये स्पार्टा व अथेन्स यामधील युध्दात डांबर आणि गंधक जाळून गुदमरून टाकणाऱ्या विषारी वायुचा उपयोग केलेला आढळतो.

जीवाणू युध्दात उपयोगात आणले जाणाऱ्या जीव-जंतूंचे पुढील प्रकारे विभाजन करणे शक्य होते. १) बॅक्टेरिया २) प्रोटीझूवा ३) स्पाइरोकीट ४) फंगल ५) एक्टिोमाइसिट्स ६) फ्लूरो न्युमोनिया जीवजंतू ७) रिकेट्सिओ ८) विषाणू

उपरोक्त जीवजंतूंचा शस्त्र म्हणून युध्दात उपयोग केला जातो. काही जीवजंतू, रोगजंतूंचा मनुष्याच्या शरीरावर, जीवनावर कायमस्वरूपी परिणाम होतो तर काहींचा परिणाम तात्पुरत्या स्वरूपाचा असतो. काही जीवाणूंचा खाद्यपदार्थ किंवा फळफळावरही परिणाम होत असतो. निरनिराळ्या जीवजंतू किंवा विषाणूंचा शत्रूवर उपयोग करताना पुढील बाबी विचारात घ्याव्या लागतात.

१) त्यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होणे आवश्यक असते.

२) पर्यावरणातील विनाशकारी परिणाम असल्यानंतर सुध्दा त्यांचा उपयोग सहजपणे, सरळपणे करता येणे शक्य असले पाहिजे.

३) शत्रूच्या संरक्षणाच्या योजना असताना सुध्दा त्यामुळे शत्रूचे नुकसान होणे किंवा शत्रूचा नाश होणे आवश्यक असते.

४) मोठ्यात मोठ्या संख्येने मानवी जीवन, प्राणी जीवन आणि वनस्पती जीवनावर परिणाम होणे आवश्यक असते. त्यामुळे महामारीसारखी रोगराई पसरणे शक्य झाले पाहिजे

उपरोक्त आणि अन्य विषारी घटकांची वैज्ञानिकांना गरज असते. शक्तीहीन आणि कमकुवत बनविणाऱ्या, रोगराई पसरविणाऱ्या घटकांची, जीवाणूंची गरज असते. रोगी काही दिवस आराम करुन, औषधे घेऊन स्वस्थ होऊ शकतात. त्यांचा मृत्यू होत नाही. रोगजंतू घातक असतील तर तत्काळ त्यांचा परिणाम अनुभवास येतो.

जैविक युध्दात प्रामुख्याने उपयोगात येणारे मुख्य माध्यम (एजन्ट) पुढीलप्रमाणे आहेत.

**१. सॅक्सीटॉक्सीन -**

लष्करीदृष्ट्या अतिशय महत्वाचे हे विष शेवाळ्यापासून केले जाते. पाण्यामध्ये त्वरित मिसळून जाणाऱ्या या विषाचा उपयोग बंदुकीच्या माध्यमातूनही करण्यात येतो . त्यासाठी बंदुकीच्या गोळीच्या पुढच्या टोकावर हे विष लावण्यात येते. शत्रु प्रदेशात ती गोळी फायर केल्यानंतर तत्काळ त्या विषाचा प्रसार होतो. त्या संपर्कात येणाऱ्या व्यक्ती मृत्यूमुखी पडतात.

**२) बोट्युलिनल टॉक्सीन्स -**

लष्करीदृष्ट्या महत्त्वाच्या या विषयाचा भयानक परिणाम चेतासंस्थेवर होतो. आज सुमारे सहा प्रकारची बोट्युलिनल विष उपलब्ध आहेत; ती पांढरी, गुळगुळीत आणि तत्काळ पाण्यात मिसळणारी आहेत. त्या विषाच्या संपर्कामुळे डोकेदुखी सुरू होऊनं अशक्तपणा निर्माण होतो. झोप येऊ लागते आणि जिभेला कोरड पडते. श्वास घेणे त्रासदायक होऊन बोलणे बंद होते. त्यानंतर शरीरातील सर्व पेशी ताठर बनून मनुष्य मृत्यूमुखी पडतो. या विषारी पदार्थांपासून उपाय करण्यासाठी अजून परिणामकारक औषध तयार झालेले नाही

**३) बेसिलस एन्थ्रेसिस -**

बॅक्टोरियामुळे एन्थेक्स नावाच्या रोगास सुरूवात होते. या रोगाचा प्रादुर्भाव अन्य प्राणिमात्रात मोठ्या प्रमाणात केला जातो. रोगाचे जीवजंतू पूर्वी ग्रेनेडद्वारा शत्रू प्रदेशात सहजपणे करता येतो. सहजतेने उत्पादित होणाऱ्या या रोगजंतूचा उपयोग शत्रूचा अन्नात, पाण्यात किंवा हवामानातही करता येतो. या

बॅक्टेरियाच्या संपर्कामुळे उलट्या होणे, सांधेदुखी किंवा श्वास घेण्यास त्रास होणे इत्यादी प्रकार संभवतात व शेवटी ती व्यक्ती मृत्युमुखी पडतात.

**कु. माधुरी पांडुरंग बोरसे**
**एस.वाय.बी.ए. (संरक्षणशास्त्र विभाग)**

*****

## सायबर युद्ध



पहिल्या महायुद्धाच्या कालावधीत रेडिओचा शोध लागलेला होता आणि काही प्रमाणत त्याचा युध्दातही उपयोग होऊ लागलेला होता. विद्युत-चुंबकीय वर्णपटाची युध्दामध्ये निर्णायक भूमिका स्पष्ट झालेली होती. त्याच वेळेस सेना व्यवस्थापन कार्यामध्ये हा एक महत्त्वाचा घटक मानला गेलेला होता. दुसऱ्या महायुध्दाच्या वेळेस विद्युत-चुंबकीय वर्णपटावर आधारित काही अस्त्र, उपकरण कार्यशील झालेली होती, त्यावेळेस रडार, रेडिओ आणि रडार प्रतिबंधक तसेच दिशाशोधक उपकरणे उपयोगात येऊ लागली होती.

लष्करी विचारवंत टॉपलरने स्पष्ट केल्याप्रमाणे 'युध्दाचे तीन तरंग' नावाच्या सिध्दान्तास पुष्टी मिळते की, माहिती वर्णपटाच्या उपयोग एक वेगळ्याच प्रकारे युध्द लढता येते तेच माहिती युध्द होय. अमेरिकन लष्करी मुख्यालयात २१ व्या शतकात सैन्य प्रशिक्षण आणि विकास याच नवीन पद्धतीच्या आधारे सुरू झाला.

संगणकीय आधारावरील नवीन युध्द प्रकार म्हणजेच सायबर वॉर होय. यामध्ये माहिती वर्णपटाचा पुरेपुर उपयोग केला जातो आणि शत्रूला त्यापासून दूर ठेवले जाते म्हणजे शत्रूला कोणत्याही प्रकारे संगणकीय कार्यवाही करू दिली जात नाही. त्यासाठी त्याच्या मार्गामध्ये निरनिराळे अडथळे निर्माण केले जातात. त्याची सर्व उपकरणे 'जाम' केली जातात. या प्रकाराच्या युध्दाचा मुख्य उद्देशशत्रु सैनिकांना आवश्यक माहिती आणि सुचना मिळू दिली जात नाही. त्यासाठी निरनिराळ्या मार्गाचा उपयोग केला जातो. अर्थात याचा परिणाम व्हायचा तोच होतो. शत्रू सैन्याच्या सेनाधिकाऱ्याला वेळेमध्ये कोणतीही सूचना किंवा आज्ञा न मिळाल्याने तो सेनाधिकारी योग्य तो निर्णय घेऊ शकत नाही त्याने घेतलेल्या निर्णयामध्ये अनेक उणिवा राहतात तसेच तो सेनाधिकारी कोणत्याही प्रकारे यशस्वी कार्यवाही करु शकत नाही.

माहिती युध्द किंवा सायबर युध्दाचे सिध्दान्त नवीन नाहीत. शेकडो वर्षापूर्वी लढल्या गेलेल्या युध्दामध्ये सुध्दा याचा उपयोग केला गेलेला आहे. पण २० व्या शतकाच्या उत्तरार्धात सूक्ष्म कार्यपद्धती (Microprocessor) आणि आकडे प्रक्षेपणe;d/e (data transmission) उच्च तंत्रज्ञानाचा विकास होऊन सायबरयुध्द अत्यंत गतिमान केलेले आहे. या तंत्रज्ञानाच्या मदतीने युध्दभूमिवरील वास्तविक फोटो आणि आवश्यक सूचना योग्य वेळी व्यक्तीजवळ पोहोचणे शक्य झालेले आहे.

एक प्रकारे इलेक्ट्रॉनिक युद्ध, मानसशास्त्रीय युध्द आणि आवश्यक सूचना व्यवस्थापनाच्या एकत्रित प्रयत्नालाच सायबर युध्द म्हणता येईल.

सायबर युध्दाचा प्रयोग कोणत्याही देशाच्या सैनिकांविरुध्द किंवा नागरिकांविरुद्ध किंवा दोहोंविरूद्ध करता येऊ शकतो. यासाठी मार्टिना लिबिच्की यांची लिहिलेल्या लेखाचा अभ्यास केला तर त्यात C२ (Command and Control) वर आधारित इलेक्ट्रॉनिकीय आणि संगणकीय माहितीवर महत्त्वाची

असते. तिचा उपयोग सर्वसामान्य लोकांवर आर्थिक दृष्टीने परिणामकारक आणि माहितीच्या दृष्टीने परिणामकारक होत असतो. हाच सर्व उपयोग सायबर वॉरमध्ये होत असतो.

**१) जाळे युध्द (Net War) -** जाळे किंवा सापळा संगणकीय भाषेमध्ये अतिशय गुंतागुंतीची रचना आहे. परस्पर विचारसरणीतील भिन्नता आणि त्यातून निर्माण होणाऱ्या संघर्षचा संबंध जाळे युध्दाशी आहे.

२६ नोव्हेंबर १९ संविधान दिनानिमित्त शपथ घेतांना प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार, कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रणव गरूड व प्राध्यापक वृंद.




१ ऑगस्ट १९ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त प्रतिमा पूजन करतांना प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार, कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रणव गरूड, डॉ. विजय भामरे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. के.डी. सोनवणे.



**राष्ट्रीय सेवा योजना**

२ ऑक्टोबर १९ गांधी जयंती निमित्त प्लास्टीक कचरा संकलन अभियान राबवतांना आदर्श कला महाविद्यालय, रा.से.यो. स्वयंवक.




आदर्श कला महाविद्यालय रा.से.यो. च्या विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर, टिटाणे येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार.




आदर्श कला महाविद्यालय रा.से.यो. च्या विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर, टिटाणे येथे विद्यार्थी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करतांना पत्रकार रघुवीरजी खारकर.

# Internal Quality Assurance Cell (IQAC)

## Annual Report 2019-20

**Prin. Dr. A. P. Khairnar**
**Prof. Atish Meshram**

Internal Quality Assurance Cell (IQAC) of Nijampur Jaitane Shikshan Prasarak Mandal Adarsh College of Arts,Nijampur-Jaitane, Tal-Sakri, Dist-Dhule was formed in January, 2009. IQAC was constituted in our institution under the Chairmanship of the Head of the institution. IQAC establishment in higher educational institutions and universities is recommended by the National Assessment and Accreditation Council (NAAC), Bangalore for the development, enhancement and sustenance of all academic work based on quality level. Post-accreditation process on sustenance measure to internalize and institutionalize quality assurance measures by the IQAC of college. The IQAC of college has worked done at quality based in all academic and administrative areas as per the revised framework of NAAC Seven Criteria. The following seven criteria are as

Criteria-I: Curricular Aspects
Criteria-II: Teaching-Learning and Evaluation
Criteria-III: Research, Innovations and Extension
Criteria-IV: Infrastructure and Learning Resources
Criteria-V: Student Support and Progression
Criteria-VI: Governance, Leadership and Management
Criteria- VII: Institutional Values and Best Practices

The mechanisms and procedure of our college through the IQAC

a) Ensuring timely, efficient and progressive performance of academic, administrative and financial tasks;
b) Relevant and quality academic/ research programmes;
c) Equitable access to and affordability of academic programmes for various sections of society;
d) Optimization and integration of modern methods of teaching and learning;
e) The credibility of assessment and evaluation process;
f) Ensuring the adequacy, maintenance and proper allocation of support structure and services;
g) Sharing of research findings and networking with other institutions in India and abroad.

**The objectives of the Cell are**

- To develop a system for conscious, consistent and catalytic action to improve the academic and administrative performance of the institution.
- To promote measures for institutional functioning towards quality enhancement through internalization of quality culture and institutionalization of best practices.
- The functions of the IQAC Cell are
- Development and application of quality benchmarks
- Parameters for various academic and administrative activities of the institution;
- Facilitating the creation of a learner-centric environment conducive to quality education and faculty maturation to adopt the required knowledge and technology for participatory teaching and learning process;

- Arrangement for feedback response from students, parents and other stakeholders on quality-related institutional processes;
- Dissemination of information on various quality parameters of higher education;
- Organization of inter and intra institutional workshops, seminars on quality related themes and promotion of quality circles;
- Documentation of the various programmes/activities leading to quality improvement;
- Development and maintenance of institutional database through MIS for the purpose of maintaining /enhancing the institutional quality;
- Development of Quality Culture in the institution;
- Preparation of the Annual Quality Assurance Report (AQAR) as per guidelines and parameters of NAAC, to be submitted to NAAC.

**Salient IQAC Initiatives**

➢ Prepared academic calendar 2019-20 at the beginning of academic year that consist of effective curriculum implemented, use of innovative teaching and learning planning, promote research culture initiatives, various activities and events, organized seminars and workshops, admission, examinations, some best practices, students support and welfare services, meetings and holidays for effective and ensuring timely, efficient and progressive performance of entire academic and administrative tasks

➢ One Day National level workshop on Digital Literacy for Women Empowerment held on 28 December, 2020 sponsored by Maharashtra State Commission for Women, Mumbai

➢ Digital Literacy training programme conducted during 01 December, 2020 to 31 December, 2020

➢ Preparation of Annual Quality Assurance Report (AQAR) of academic year 2019-20.

➢ Conducted meetings of IQAC at College IQAC room for planed and prepared the academic work based on quality.

➢ Quarterly meetings with staff teachers are initiated to formulate the plan of action

➢ Participated in National Institutional Ranking Framework (NIRF)

➢ Participated in Aviskar Competition organized by Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon.

➢ Conducted Student Satisfaction Survey (SSS)

➢ Organized Yuwati Personality Development Programme

➢ Computer and Internet Literacy Programme

➢ SwayamsiddhaShibir for girls.

➢ Soft Skills, Communication Skills and Employability Skills

➢ Competitive Examination Classes

➢ Promoting in Participation of faculty in Seminars and Workshops

➢ PBAS , Performance Appraisal Report and API Assessing and Collection

➢ Preparing Self Study Report for Third Cycle

➢ Academic Calendar 2019-20 has prepared

➢ Promote the Research Culture

➢ Publication of College Prospectus and Magazine

➢ Arranged the Add-on courses on various subject

➢ Started Certificate courses at university level

➢ PBAS and API/ARS checking

➢ The IQAC has taken initiative to conduct result analysis for the previous online and offline examination.

➢ IQAC encouraged teachers to obtain feedback from students, alumni, parents and

stakeholders on curricular and teaching learning aspects.

- IQAC ensured that result analysis of FYBA,SYBA and TYBA Exam
- Special coaching classes like Remedial classes and Extra classes for the slow learners after the working hours with proper scheduled made by IQAC.
- IQAC motivate to the teachers for Guidance and Counseling of students
- Adopted innovative teaching-learning method for the effective online and offline classroom teaching
- College internal exam and university exam conducted through the online and offline mode was effectively during COVID-19 period
- To motivate subject teachers for publication of research work in International and National UGC Care list and Open Access Journal with good Impact Factor
- There were two Best Practices the college has taken that is one "Yuwati Personality Development" and second one is "Developing Research Initiatives"

*****

## State Level Workshop on Interview Techniques and Confidence Building

**Prof. A.R. Ingle**
**Prof. A.S. Meshram**

Nijampur - Jaitane Shikshan Prasarak Mandal's Adarsh college of Arts organized one day State Level Workshop on 'Interview Techniques and Confidence Building'on 11 February, 2020 at Conference Hall of the college. The Principal of S.G.Patil Arts, Commerce and Science college Sakri, Dr. R.R.Ahire was the guest of honor while the Chairman of Adarsh college of Arts, Nijampur - Jaitane Adv.Sharadchandra Jagannath Shah Presided over the function. Dr. Tejesh Beldar from Nashik, Dr. Vijay Chaudhari and Dr. D. S. Chauhan were the resource persons of the workshop. There were four sessions in the workshop.

**Inaugural Session**

Chairman - Adv. Sharadchandra Shaha

Speaker – Dr. R. R. Ahire

The state level workshop started with an inaugural session. The principal Dr. R. R. Ahire inaugurated the workshop. He graced the occasion as the guest of honor. The first inaugural session was followed by lighting of the lamp, felicitation of the guest. The girl students of department of English performed a melodious welcome song. The honorable principal of the college, Dr. A. P. Khairnar gave an introductory remark. He said that students of our college are from rural and tribal areas. The college inculcates the moral values and educational values among them by organizing such types of the workshop. He also presented the aim and mission of the college in his introductory remark.

The guest of honor Dr. Ahire delivered inaugural speech. He mentioned an important tip to grow the competence level of the students. He added the different aspects of interview techniques and explained how the participants would be benefited from such kind of workshop. The inaugural session ended with the vote of thanks delivered by the convener of workshop Prof. Atish Meshram while anchoring is done by co-coordinator Prof. Ajabrao R. Ingle. The first session was conducted from 10 a.m. to 11 a.m.

**First Session: Interview Techniques**

Chairman – Dr. Kasabe

Speaker – Dr. Tejas Beldar

The first session started by Dr. Tejas Beldar from Nasik. He was facilitated by Prof. A. R. Ingle. He delivered on the topic

interview techniques. In this session participants actively participated and interacted on the techniques of interview. Dr. Beldar provided relevant innovative ideas to develop interview techniques among students. He made an excellent presentation on PPT. The participants were asked to perform various types of task work assigned by him. He added the importance of interview in the life of students. It is the need of hour to develop the skills in global market. The Chairman, Dr. Prashant Kasabe remarked positively over the session.

**Second Session : Confidence Building**

Chairman - Dr. D. S. Chauvhan

Speaker – Dr. Vijay Chaudhary

The second session was conducted on the topic on Confidence Building; The key speaker was Dr. Vijay Chaudhary from G. T. P. College Nandurbar. In the beginning of the session, he explained the value of confidence in our life. In his presentation he showed motivational videos regarding confidence building. All participants inspired by his presentation. He also conducted remembrance test by distributing students among groups. There was huge response for the session. The chairperson, Dr. D. S. Chauvan remarked positively over the session.

**Second Session : Digital Skill**

Chairman - Dr. Dinesh Deore

Speaker - Dr. Vijay Chaudhary

Dr. D.S Chavhan was the resource person of third session while Dr, Denesh Deore from G.T. Patil college Nandurbar presided over the function of the third session. Dr.Chavhan made presentation on Digital Skills. He introduced all the participants' the techniques of digital awareness. His talk was followed by technical lesson. Dr.Dinesh Devre appreciated the resource person and his effort taken to make the excellent presentation.

**Valedictory Function :** The Principal of the college Dr. A.P. Khairnar presided over the function and appreciated the contribution of the coordinator and convener. He also expressed the financial assistant of KBCNMU Jalgaon.

*****

## परीक्षा समिती अहवाल

## शै.वर्ष २०१९-२०

**प्रा.अतिश मेश्राम, डॉ. विजय. ग.गुरव**

**डॉ. प्रियंका सुलाखे, डॉ. प्रविण मोरे**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचा ठराविक वेळेनुसार आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे या केंद्रात शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रथम सत्रांत FYBA, SYBA आणि TYBA व द्वितीय सत्रात Corona virus या जागतिक महामारी मुळे TYBA च्या परीक्षा Online व Offline या पद्धतीने परीक्षा घेण्यात आल्या. सविस्तर अहवाल पुढिल प्रमाणे आहे.

- **प्रथम सत्र**

शैक्षणिक वर्षाच्या प्रथम सत्राची सुरुवात १५ जुन २०१९ पासून झाली. विद्यापीठाच्या वेळेनुसार व syllabus प्रमाणे प्रथम सत्राचे संपूर्ण Course विद्यार्थ्यांना प्रध्यापाकाद्वारे शिकवण्यात आले. FYBA करिता Choice Based Credit System (CBCS) विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार सुरु करण्यात आले असून त्यानुसार विद्यार्थ्यांना शिकविण्यात आले. महाविद्यालयात FYBA, SYBA आणि TYBA वर्गाच्या अंतर्गत व मुख्य परीक्षा विद्यापीठ स्तरावर घेण्यात आल्या.

- **अंतर्गत परीक्षा (Internal Exam)**

दिनांक ११/०९/२०१९ ते २७/०९/२०१९ या दरम्यान अंतर्गत परीक्षा घेण्यात आले.

अंतर्गत परीक्षेतील गुणदान हे Test, Tutorial, behaviour आणि Attendance या पद्धती नुसार करण्यात येते. हे गुणदान College Assessment म्हणून Online KBCNMDigital University मध्ये submit करण्यात येते.

Central Assessment Programme (CAP) हे आपल्या महाविद्यालयात FYBA वर्गाचा Central Assessment Programme (CAP) दिनांक १८/११/२०१९ ते २५/११/२०१९ या कालावधीत आयोजित करून FYBA चे Paper तपासून University Assessment चे गुणदान देऊन Online KBCNMDigital University मध्ये submit करण्यात आले.

- **University Main Exam**

विद्यापीठाच्या मुख्य परीक्षा दिनांक २६/०३/२०१९ ते २२/०५/२०१९ या कालावधीत महाविद्यालयाचा केंद्रात यशस्वीरीत्या घेण्यात आल्या.

- **द्वितीय सत्र**

शैक्षणिक वर्षाच्या द्वितीय सत्राची सुरुवात २५ November २०१७ पासून झाली. विद्यापीठाच्या वेळेनुसार व syllabus प्रमाणे द्वितीय सत्राचे संपूर्ण Course विद्यार्थ्यांना प्रध्यापाकाद्वारे शिकवण्यात आले. महाविद्यालयात FYBA, SYBA आणि TYBA वर्गाच्या अंतर्गत व मुख्य परीक्षा विद्यापीठ स्तरावर घेण्यात आल्या.

- **अंतर्गत परीक्षा (Internal Exam)**

दिनांक १०/०२/२०२० ते २८/०२/२०२० या दरम्यान अंतर्गत परीक्षा घेण्यात आले.

अंतर्गत परीक्षेतील गुणदान हे Test, Tutorial, behaviour आणि Attendance या पद्धती नुसार करण्यात येते. हे गुणदान College Assessment म्हणून Online KBCNMDigital University मध्ये submit करण्यात येते.

- **Main Exam**

Corona virus या जागतिक महामारी मुळे भारत सरकारच्या आदेशान्वये संपूर्ण देशात मार्चच्या अखेर पासून ते आजपर्यंत लोच्कडोव्न ची परिस्थिती असल्यामुळे मार्च-एप्रिल मध्ये होणाऱ्या विद्यापीठाच्या परीक्षा केंद्र सरकार, राज्य सरकार, उच्च व तंत्रशिक्षण विभाग व विद्यापीठच्या परिपत्रकानुसार पुढे ढकलण्यात आल्या तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासनाच्या वतीने FYBA व SYBA च्या परीक्षा रद्द करून सरसकट सर्व विद्यार्थ्यांना पास करून पुढिल वर्षात प्रवेश देण्यात आले. Corona virus ची स्थिती नियंत्रणात असल्यामुळे World Health Organization, Geneva, Switzerland व Indian Council of Medical Research, New Delhi च्या नियमानुसार महाविद्यालय परीक्षा केंद्रात सर्व प्रकारच्या उपाययोजना जसे Mask लावणे, हात वारंवार साबणाने धुणे किवा Sanitize करणे व Social Distancing ठेवणे इत्यादी नियमांचे पालन करून विद्यापीठाच्या TYBA च्या मुख्य परीक्षा दिनांक १२/१०/२०२० ते १२/११/२०२० या कालावधीत Online व Offline mode मध्ये यशस्वीरीत्या घेण्यात आल्या. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांनी या oonnlliinnee परीक्षेकरिता जवळ-जवळ ९८ % उपस्थिती नोंदवली.

विद्यापीठ परीक्षेला FYBA, SYBA आणि TYBA वर्गाच्या सर्व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. FYBA, SYBA व TYBA ला विद्यार्थ्यांची परीक्षेला लक्षणीय उपस्थिती होती. परीक्षेकरिता परीक्षा समितीने उत्तम नियोजन करून यशस्वीपणे परीक्षेचे काम पूर्ण करण्यात आले यासाठी सर्व प्राध्यापकांचे व प्रध्यापक्तर बंदूचे सहकार्य लाभले त्याचबरोबर आदरणीय प्राचार्य साहेबांचे देखील मार्गदर्शन वेळो-वेळी मिळाले.

*****

## विद्यार्थी विकास अहवाल

## वार्षिक अहवाल - शै. वर्ष २०१९-२०

**प्रा.डॉ. के. डी. सोनवणे**

**(विद्यार्थी विकास अधिकारी)**

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये १६.०६.२०१९ रोजी महाविद्यालय सुरू झाले. त्यादिवशी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थी विकास समितीची बैठक आयोजित करण्यात आली. त्यात यावर्षी घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले व पुढील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.

दि. २ ऑगस्ट २०१९ रोजी सी.गो. पाटील महाविद्यालय, साक्री येथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र घेण्यात आले. त्यात ०६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दि. १० ऑगस्ट २०१९ रोजी आदिवासी विद्यार्थी दिवस साजरा करण्यात आला. या दिवशी महाविद्यालयातील आदिवासी विद्यार्थ्यांनी आदिवासी नृत्य सादर केले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार यांनी 'आदिवासी समाजाला भेडसावणाऱ्या समस्या' या विषयावर व्याख्यान दिले.

दि. १३ ऑगस्ट २०१९ रोजी सांगली व कोल्हापूर येथे पावसामुळे नुकसान झाले म्हणून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सांगली व कोल्हापुरासाठी पुरग्रस्त निधी रॅली काढली.

दि. १६ ऑगस्ट २०१९ रोजी महाराष्ट्र शासनामार्फत युवा माहितीदूत कार्यक्रम आयोजित करण्यात आला. श्री. गायकवाड साहेब यांनी शासनामार्फत तरूणांसाठी ज्या ज्या योजना राबविल्या जातात त्याविषयी माहिती दिली.

दि. २७ ऑगस्ट २०१९ रोजी महाविद्यालयाचे अध्यक्षक्ष ॲड. शरदचंद्र जगन्नाथ शाह यांच्या वाढदिवसानिमित्ताने रक्तदान शिबीर घेण्यात आले. त्यात महाविद्यालयातील १२ विद्यार्थी व निजामपूर-जैताणे गावातील १६ पालकांनी असे एकूण २८ दाम्प्त्यांनी रक्तदान केले व प्रथम वर्ष वर्गातील विद्यार्थ्यांचे रक्तगट तपासण्यात आले.

दि. ३ व ४ ऑक्टो. २०१९ रोजी एम.जे. कॉलेज जळगाव येथे विद्यार्थी साहित्य संमेलन घेण्यात आले. त्यात २ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दि. १ ऑक्टोबर २०१९ रोजी व्ही.यु. पाटील महाविद्यालय, साक्री येथे नाव्यकौशल्य कार्यशाळा घेण्यात आली. त्यात ८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दि. १ डिसेंबर २०१९ रोजी एड्स जनजागृती कार्यक्रम सादर करण्यात आला. त्यात महाविद्यालयातील विद्यार्थीनी कु. अश्विनी अविनाश जाधव हिने 'एड्स निर्मुलन काळाची गरज' या विषययावर मनोगत व्यक्त केले.

दि. ३० डिसेंबर २०१९ रोजी सि.गो. पाटील महाविद्यालय येथे आविष्कार घेण्यात आला. त्यात महाविद्यालयातील प्राध्यापक व १२ विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रदर्शन केले.

दि. ९ जानेवारी २०२० रोजी व्ही.यु. पाटील महाविद्यालय, साक्री येथे युवती सभा घेण्यात आली. त्यात ८ विद्यार्थीनींनी सहभाग घेतला.

दि. १० ते १२ जानेवारी २०२० रोजी सि.गो. पाटील महाविद्यालय, साक्री आयोजित आई म्हसाई माता मंदीर, निजामपूर येथे आदिवासी विद्यार्थी आत्मविश्वास व प्रेरणा शिबीर घेण्यात आले. त्यात ६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दि. १३ जानेवारी २०२० रोजी आण्णासाहेब आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय, म्हसदी येथे युवती सभा घेण्यात आली. त्यात ७ विद्यार्थीनींनी सहभाग घेतला.

दि. २५ जानेवारी २०२० रोजी मतदार दिवस साजरा करण्यात आला. या दिवशी ज्यांचे नावव मतदार यादीत आले आहे अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार यांच्या हस्ते मतदान कार्ड वाटप करण्यात आले व ज्यांचे वय १८ वर्षे पूर्ण झाले असेल अशा नवमतदार विद्यार्थ्यांचे फॉर्म भरण्यात आले.

दि. ६ फेब्रुवारी २०२० रोजी आ.मा. पाटील महाविद्यालय, पिंपळनेर येथे युवतीसभा घेण्यात आली. त्यात ५ विद्यार्थीनींनी सहभाग घेतला.

दि. ५ मार्च २०२० रोजी कमवा व शिका योजनेत ५ विद्यार्थ्यांची निवड झाली. त्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फत धनादेश अदा करण्यात आला.

दि. ७ मार्च २०२० रोजी 'आर्थिक दुर्बल घटक' योजनेमध्ये ज्या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे अशा ११ विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फत धनादेश अदा करण्यात आला.

दि. ८ मार्च २०२० रोजी 'जागतिक महिला दिनाच्या' निमित्ताने महाविद्यालयात 'माझी आई माझे महाविद्यालय' हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. त्यात महाविद्यालयातील विद्यार्थीनींनी आपल्या आईला सोबत आणले होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी दादासाहेब अनिल राणे, आण्णासाहेब रघुविर खारकर, ताईसो.सौ. किरण अशोक खैरनार हे होते. तर अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक खैरनार हे होते. सदर कार्यक्रमात तृतीय कला शाखेची विद्यार्थीनी कु. जाधव अश्विनी अविनाश हिची आई सौ. जाधव शिला अविनाश यांनी मुलींनी आपले करिअर कसे घडवावे या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले.

*****

## राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक अहवाल - शै.वर्ष २०१९-२०

**प्रा. प्रणव गरूड**

**(कार्यक्रम अधिकारी)**

दि. १५ जून २०१९ रोजी शैक्षणिक वर्ष २०१९-२० ची सुरुवात झाली. आमच्या आदर्श महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना शककाच्या उपक्रमाबाबत राष्ट्रीय सेवा योजना एकाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोकजी खैरनार यांच्या अध्यक्षते खाली शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रम अधिकारी म्हणून महाविद्यालयातील इतिहास विषयाचे प्राध्यापक प्रणव गंगाधर गरुड यांची निवड करण्यात आली. तर सहाय्यक कार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा. यशवंत रघुनाथ कुलकर्णी यांची तर महीला कार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा. प्रियंका प्रकाश सुलाखे यांची निवड करण्यात आली.

दि. २६ जून १९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना एककाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोकजी खैरनार यांच्या मार्गदर्शना खाली राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या विविध उपक्रमाबाबत बैठकिंचे आयोजन करण्यात आले. या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयास नियमित १५० विद्यार्थी तर श्रमसंस्कार शिबीरासाठी ७५ विद्यार्थी संख्या मान्यता असल्याचे राष्ट्रीय सेवा योजना अध्यींनी सांगितले व त्या नुसार विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना एककात प्रवेश देण्याविषयी सुचना दिल्या आणि कबचौउमवी जळगांव यांच्या पत्रकानुसार राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत राबविण्यात विविध उपक्रमांविषयी तसेच आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य स्तरीय विशेष दिवस आणि विद्यार्थी शिबीर या बाबत वार्षिक नियोजन करण्यासंबंधी व विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीराच्या नियोजनाबाबत राष्ट्रीय सेवा योजना अध्यक्ष व

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक खैरनार यांनी कार्यक्रम अधिकारी, सहाय्यक अधिकारी व महिला कार्यक्रम अधिकारी यांना बैठकित मार्गदर्शन केले.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० चा नियोजीत वार्षिक अहवाल सादर करतांना मनस्वी आनंद होत आहे. समाजहित व राष्ट्र उभारणीसाठी युवक हा महत्व पूर्ण घटक मानला जातो. माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी युवा शक्ती आधारावरच २०२० पर्यंत आपला देश जागतिक महासत्ता होण्याचे स्वप्न पाहीले. राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या माध्यमातून या अशा युवा शक्तीच्या पंखात बळ निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे व्यासपीठ निर्माण करण्यात आले आहे. राष्ट्रपीता महात्मा गांधी यांच्या जन्म शताब्दी निमित्ताने सुरु झालेल्या या उपक्रमाची सुरुवात आमच्या आदर्श कला, महाविद्यालयात सन १९९८ पासून झाली आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२० या वर्षात महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या माध्यमातून खालील प्रमाणे संबंधीत प्राध्यापक आणि राष्ट्रीय सेवा योजना एककातील स्वयंसेवक यांच्या विकासासाठी खालील प्रमाणे महाविद्यालयाव्दारे उपक्रम राबविले गेले.

१) २१ जून योगदिनाच्या कार्यक्रमात प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी झाले.

२) दि. ९ जुलै २०१९ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना एककाज्या शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० चे उद्‌घाटन वृक्षारोपणाने करण्यात आले. जे. के. नगर निजामपूर येथे ५० झाडे लावण्यात आले.

३) ३१ जुलै २०१९ रोजी गटारी अमवस्येचे औचित्य साधून व्यसनांचे दुष्परीणाम या विषयावर निजामपूर येथील डॉ. एल. डी. पाटील यांचे प्रबोधनपर व्याख्यान आयोजित केले गेले.

४) दि. १ ऑगस्ट २०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना एककाव्दारे लोकमान्या टिळक पुण्यतीथी व लोक शाहिर आण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली.

५) दि. ९ ऑगस्ट २०१९ रोजी क्रांती दिनाच्या निमित्ताने हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले.

६) दि. १४ ऑगस्ट रोजी स्वतंत्र्य दिनाच्या पूर्वसंधेला राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी महाविद्यालयीन व ध्वजवंदन परीसराची स्वच्छता केली व ध्वजवंदनासाठी तसेच एन. सी. सी. परेडसाठी मैदानाची आखणी क्ली. व दिनांक १५ ऑगस्ट २०१९ रोजी सर्व स्वयंसेवक ध्वजवंदनासाठी उपस्थित राहीले.

७) दि. १६ ऑगस्ट २०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने निजामपूर पोलीस स्टेशन येथे रक्षा बंधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

८) दि. १९ ऑगस्ट २०१९ रोजी युवा माहितीदूत उपक्रमाबद्दल राष्ट्रीय सेवा योजनाव्दारे मार्गदर्शन करण्यात आले.

९) दि. २० ऑगस्ट २०१९ रोजी सद्‌भावना दिवस निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने कार्यक्रम घेण्यात आला. त्यात राष्ट्रीय सेवा योजनेचे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोकजी खैरनार यांनी सद्‌भावना दिवसाबद्दल स्वयंसेवकांना मार्गदर्शन क्ले व राष्ट्रीय सेवा योजनेच्या मुल्य संस्कारातून मानवी सद्‌भावना कशी जपली जाऊ शकते. या विषयी बहुमोल मनोगत व्यक्त क्ले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम- अधिकारी प्रा. प्रणव गरुड, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. यशवंत कुलकर्णी व महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियंका प्रकाश सुलाखे यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक वृंद व स्वयंसेवक उपस्थित होते.

१०) दि. २१ ऑगस्ट २०१९ रोजी महाविद्यालयात रेड रीबीन क्लबचे उद्‌घाटन करण्यात आले.

११) दि. २७ ऑगस्ट २०१९ रोजी महाविद्यालयचे अध्यक्ष मा. ॲड. शरदचंदजी शहा यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रीय

सेवा योजना एककाच्या वतीने रक्तदान व रक्तगट तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले.

१२) दि. ५ सप्टेंबर २०१९ रोजी शिक्षक दिन व सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती साजरी करण्यात आली.

१३) दि. १४ सप्टेंबर २०१९ रोजी हिंदी राष्ट्रभाषा सप्ताह निमित्त राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या विभागाने हिंदी दिवसाचे आयोजन करण्यात आले.या अनुशंगाने महाविद्यालयाचे हिंदी विषयाचे प्रमुख प्रा. डॉ. विजय गुरव हे प्रमुख मार्गदर्शन म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक खैरनार यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भुषविले. या राष्ट्रभाषा सप्ताहाच्या निमित्ताने सर्व उपस्थितांना डॉ. गुरव यांनी मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रणव गरुड यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. यशवंत कुलकर्णी यांनी केले.

१४) राष्ट्रीय सेवा योजना वर्धापनानिमित्त महाविद्यालयात दि. २४/०९/२०१९ ते ३०/०९/२०१९ या कालावधीत सप्ताह साजरा करण्यात आला या सप्ताहात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने दि. २४/९/१९ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा. प्रविण मोरे हे होते. राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन सप्ताहदिनानिमित्त त्यांनी स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजना विषयी बहुमोल मार्गदर्शन केले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. अशोक खैरनार होते. त्यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवसाचे महत्व व उद्देश या विषयावर उपयुक्त मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रणव गरुड यांनी केले. तर सुत्र संचालन सहाय्यक अधिकारी प्रा. यशवंत कुलकर्णी यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा. प्रियंका प्रकाश सुलाखे यांनी केले. या नंतर स्वच्छता रॅली काढण्यात आली.

१५) दि. २/१०/२०१९ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी व मा. पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त सांप्रदायीक सद्भावना दिवस व जागतिक अहिंसा दिवस महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककाव्दारे उत्स्फुर्तपणे साजरा करण्यात आला. अहिंसा दिनानिमित्त स्वयंसेवकांनी अहिंसा प्रतिज्ञा घेतली. या वर्षी राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियोजना प्रमाणे तंबाखू विरोधी शपथ सर्व स्वयंसेवकांनी घेतली. त्यानंतर प्लास्टिक कचरा संकलना साठी मोहीम व रॅलीचे आयोजन करण्यात आले. प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. अशोकजी खैरनार त्यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रणव गरुड यांनी केले. तर सुत्र संचालन सहाय्यक अधिकारी प्रा. यशवंत कुलकर्णी यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा. प्रियंका प्रकाश सुलाखे यांनी केले.

१६) दि. ६ ऑक्टोबर २०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने मौजे टिटाणे ता. साक्री जि. धुळे. प्रस्ताविक दत्तक गावी एक दिवसीय शिबीराचे आयोजन केले गेले. जिल्हा परीषद मुलांची शाळा, टिटाणे येथील परीसरात स्वच्छता करण्यात आली. या प्रसंगी कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रणव गरुड यांनी स्वयंसेवकांना भार्गदर्शन केले.

१७) दि. १५/१०/२०१९ रोजी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला.

१८) दि. ३१ ऑक्टोबर २०१९ रोजी सरदार वल्लभभाई पटेल जयंती निमित्त प्रतिमा पुजन करण्यात आले.

१९) दि. २६ नोव्हेंबर २०१९ रोजी संविधान दिनानिमित्त शपथ घेऊन स्वयंसेवकांनी संविधान दिन साजरा केला.

२०) दि. २०/१२/२०१९ ते दि. २६/१२/२०१९ या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजना एककाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर मौजे टिटाणे ता. साक्री जि. धुळे. या दत्तक गावातील जिल्हा परिषद शाळा येथे

घेण्यात आले. शिबीरात शैचालय, जनजागृती, तंबाखू निर्मूलन, बेटी बचाओ बेटी पढाओ, आपत्ती व्यवस्थापन, जलव्यवस्थापन, श्रमदान इ. विषयांवर काम करुन शिबीर संपन्न झाले. शिबीरासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे अध्यक्ष व प्राचार्य डॉ. अशोकजी खैरनार यांचे मार्गदर्शन लाभले.

२१) दि. १३/०१/२०२० रोजी स्वामी विवेकानंद जयंती निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने राष्ट्रीय युवक सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख अतिथी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. अशोक खैरनार होते. कार्यक्रमासाठी प्रा. प्रणव गंगाधर गरुड, प्रा. यशवंत कुलकर्णी, प्रा. प्रियंका सुलाखे यांनी परिश्रम घेतले.

२२) दि. २६/०१/२०२० रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन परिसर स्वच्छता करुन गणतंत्र दिवसाच्या कार्यक्रमासाठी मैदान आखणी आणि ध्वजवंदनाच्या तयारीसाठी सक्रिय योगदान दिले. ध्वजवंदनात सहभाग घेऊन गणतंत्र दिवसाच्या निमित्ताने आयोजित समारंभात सहभागी झाले.

२३) दि. १७ जानेवारी २०२० ते दि. ३१ जानेवारी २०२० या दरम्यान स्वच्छता पखवाडा साजरा केला गेला. या दरम्यान

* दि. १७ जानेवारी २०२० रोजी - स्वच्छता शपथ
* दि. २१ जानेवारी २०२० रोजी - कॉलेज स्वच्छता अभियान
* दि. २३ जानेवारी २०२० रोजी - स्वच्छता चर्चा सत्र
* दि. २४ जानेवारी २०२० रोजी - स्वच्छता पोस्टर प्रदर्शन
* दि. २५ जानेवारी २०२० रोजी - स्वच्छता व्याख्यान
* दि. २६ जानेवारी २०२० रोजी - होस्टेल स्वच्छता अभियान
* दि. २८ जानेवारी २०२० रोजी - बेस्ट आऊट ऑफ वेस्ट स्पर्धा
* दि. ३० जानेवारी २०२० रोजी - शहीद दिवस
* दि. ३१ जानेवारी २०२० रोजी - स्वच्छता पखवाडा स्पर्धा बक्षिस वितरण हे कार्यक्रम आयोजित केले गेले.

२४) दि. ३ फेब्रुवारी २०२० रोजी रस्ते सुरक्षा सप्ताहानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

२५) दि. ३०/१/२०२० रोजी हुतात्मा दिवसाच्या निमित्ताने शहीद जवानांना आदरांजली अर्पण केली. कार्यक्रम समाप्ती नंतर स्वयंसेवकांनी जैताणे दत्तक वस्तीत जाऊन परिसर स्वच्छता केली आणि सांड पाण्याच्या नियोजना विषयी दत्तक वस्तीतील नागरिकांना समुपदेशन केले. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. अशोकजी खैरनार यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रणव गरुड सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. यशवंत कुलकर्णी व महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियंका प्रकाश सुलाखे यांनी परिश्रम घेतले.

दि. ९/३/२० रोजी जागतिक महिला सप्ताह निमित्ताने महिला सम्मान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रस्तुत कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोकजी खैरनार यांच्या हस्ते महाविद्यालयातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांनी तसेच आदर्श संकूलातील माध्यमिक, प्राथमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षिका व महिला कर्मचाऱ्यांचा गुलाब पुष्प देऊन सम्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे अध्यक्ष बाबसाो. ॲड. शरदचंद्रजी शाह उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकार प्रा. प्रणव गरुड, सुत्र संचलन महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियंका प्रकाश सुलाखे तर आभार प्रदर्शन विद्यार्थीनी स्वयंसेविका कु जगदाळे भाग्यश्री हिने केले. या प्रसंगी बेटी बचाओ, बेटी पढाओ या विषयावर जनजागृती घडवण्यासाठी विद्यार्थीनींच्या रॅलीचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रणव गरुड सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. यशवंत कुलकर्णी व महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियंका प्रकाश सुलाखे यांनी परिश्रम घेतले.

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद कार्यक्रमाला उपस्थित होते.

वरील कार्यक्रमा व्यतिरीक्त राष्ट्रीय सेवा योजना एककातील स्वयंसेवकांना विद्यार्थी नेतृत्व, विद्यार्थी विकास शिबीर तसेच विविध कार्यशाळांसाठी विविध ठिकाणी पाठवण्यात आले. अशा प्रकारे आदर्श कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या निमित्त कार्यक्रमाचे नियोजन केले गेले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष बाबासो. ॲड. शरदचंद्रजी शाह यांचे मार्गदर्शन व प्रेरणा तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य राष्ट्रीय सेवा योजना एककाचे अध्यक्ष डॉ. अशोकजी खैरनार यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रणव गरुड सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. यशवंत कुलकर्णी व महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियंका प्रकाश सुलाखे यांचे नियोजन तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकत्तर वृंद यांच्या सहकार्यातून राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित कार्यक्रमासाठी मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन मिळाले. यातूनच राष्ट्रीय सेवा योजना एककाचे कार्य वाटचाल करत आहे.

ध्यन्यवाद !

*****

## स्वयंसिद्धा अहवाल

## (१७.१०.२०१९ ते २४.१०.२०१९)

**प्रा.डॉ. प्रियंका सुलाखे**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, विध्यार्थी विकास विभाग व आदर्श कला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवती सभा अंतर्गत आठ दिवसीय कराटे प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले प्रा.उपाध्याय, प्रा.अहिरे प्रशिक्षक म्हणून लाभलेले प्रा.निलेश सनेर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक पी.खैरनार, विद्यार्थी विकास विभागप्रमुख प्रा.के.डी. सोनवणे, माजी युवती सभा प्रमुख डॉ. व्ही.जी. गुरव, प्रा. वाय.आर. कुलकर्णी, युवती सभा समन्वयक डॉ.प्रियंका सुलाखे इ.मान्यवर मंचावर उपस्थित होते. शिबिराची सुरुवात प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले प्रा.उपाध्याय,प्रा.अहिरे, प्राचार्य डॉ.अशोक पी.खैरनार, प्रशिक्षक म्हणून लाभलेले प्रा.निलेश सनेर व व्यासपीठावर उपस्थित सर्व मान्यवरांनी दीप प्रज्वलन व सरस्वती पूजन करून केली. शिबिरासाठी उपस्थित मान्यवरांचा परिचय व सूत्रसंचालन डॉ.प्रियंका सुलाखे यांनी केले. प्रशिक्षक म्हणून लाभलेले प्रा.निलेश सनेर व व्यासपीठावर उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत प्राचार्य डॉ.अशोक पी.खैरनार तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ.अशोक पी. खैरनार यांचे स्वागत डॉ. व्ही.जी.गुरव यांनी केले. आठ दिवसीय प्रशिक्षण शिबिरासाठी लाभलेले प्रशिक्षक प्रा.निलेश सनेर यांनी कराटे त्याची कौशल्य व दैनदिन जीवनात त्याचा उपयोग व त्यातून करता येणारे स्व-संरक्षण या बद्दल विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. तसेच प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले प्रा.उपाध्याय यांनी आपल्या मनोगतात सांगितले कि,आजही समाजात मुलींवर अनेक बंधन आहेत तसेच समाजातील वातावरणही घटक आहे अश्या परिस्थितीत मुलीनी स्वसंरक्षणासाठी कौशल्य आत्मसात करणे काळाची गरज आहे. मुलीनी मानसिकच नव्हे तर शारीरिकदृष्ट्या सक्षम असण महत्वाच आहे. आजच्या काळात मुलींनी रक्षणासाठी दुसर्यावर अवलंबून न राहता स्वतःचे संरक्षण स्वतः करणे शिकायला हवे.

प्रा. के.डी. सोनवणे यांनी रोज करणाऱ्या कामातून महिला कशी सक्षम बनू शकते यावर प्रकाश टाकला तसेच कोणतेही काम आत्मविश्वासाने करावे असे मत मांडले.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण मा.प्राचार्य डॉ.अशोक खैरनार यांनी केले. त्यांनी आपल्या

अध्यक्षीय भाषणात सांगितले कि, महिला सबलीकरण हि काळाची गरज आहे. महाविद्यालयात राबवलेल्या विविध उपक्रमातून महिला सक्षमीकरण होत असते.मुलींनी या प्रत्येक संधीचा फायदा घेण महत्वाच असत. याच्याच माधमातून महिला स्वयंसिद्ध होऊ शकतो असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.अशोक पी.खैरनार यांनी क्ले.व उद्घाटन कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ.प्रियंका सुलाखे यांनी केले.

आठ दिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि.१७/१०/२०१९ ते २४/१०/२०१९ या दरम्यान सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत करण्यात आले होते. या आठ दिवसात प्रशिक्षक प्रा.निलेश सनेर यांनी कराटेतील punches, kicks self defense यासारखी विविध कौशल्य शिकवले.तसेच कराटे सोबतच बॉक्सिंग खेळाची विविध कौशल्याचे प्रात्यक्षिक दाखवून त्याचा सरावही करून घेतला. शिकवलेले कराटेची कौशल्य याचे प्रत्यक्ष सराव समूह करून घेतला.

दि.२४/१०/२०१९ रोजी प्रशिक्षण शिबिराचा समारोप करण्यात आला होता. समारोपासाठी प्रशिक्षक म्हणून लाभलेले प्रा.निलेश सनेर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक पी.खैरनार, विद्यार्थी विकास विभागप्रमुख प्रा. के.डी. सोनवणे, माजी युवती सभा प्रमुख डॉ. व्ही.जि.गुरव, युवती सभा समन्वयक डॉ.प्रियंका सुलाखे इ.मान्यवर मंचावर उपस्थित होते. प्रशिक्षक म्हणून लाभलेले प्रा.निलेश सनेर व व्यासपीठावर उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत प्राचार्य डॉ.अशोक पी. खैरनार तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार यांचे स्वागत डॉ. व्ही.जि. गुरव यांनी केले. प्रशिक्षक प्रा.निलेश सनेर यांनी खेळातून व्यावसायिक दृष्टीकोनातून असणाऱ्या संधी याबद्दल मार्गदर्शन तसेच आयोजनाबद्दल मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण मा.प्राचार्य डॉ.अशोक खैरनार यांनी केले. व समारोप कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ.प्रियंका सुलाखे यांनी केले.

*****

## युवती व्यक्तिमत्व विकास चर्चासत्र

## अहवाल - शै.वर्ष २०१९-२०

**प्रा.डॉ. प्रियंका सुलाखे**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, विद्यार्थी विकास विभाग व आदर्श कला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय युवती सभेअंतर्गत विद्यार्थिनींचा व्यक्तिमत्व विकास चर्चासत्र दि. ३१/०१/२०२० शुक्रवार रोजी महाविद्यालयात आयोजित करण्यात आली. या चर्चासत्राची वेळ ९.०० ते ५.३० ठेवण्यात आली होती. यात चार सत्रांचा समावेश करण्यात आला होता. प्रथम, दुसऱ्या तिसऱ्या सत्रात विद्यार्थिनींना प्रमुख वक्त्यांनी मार्गदर्शन केले व चतुर्थ सत्रात विद्याथिनीनी पेपर वाचन केले. या चर्चासत्रात १२६ विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, विद्यार्थी विकास विभाग व आदर्श कला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय युवती सभेअंतर्गत विद्यार्थिनींचा व्यक्तिमत्व विकास चर्चासत्राचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे अध्यक्ष मा. बाबासाहेब शरदचंद्रजी शाह यांनी स्वीकारले. चर्चासत्राच्या उद्घाटनाचे सूत्रसंचालन डॉ. प्रियंका सुलाखे यांनी क्ले. या चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून प्रा.मेघा खारकर उपस्थित होत्या. चर्चासत्राची सुरुवात चर्चासत्राचे अध्यक्ष मा. बाबासाहेब शरदचंद्रजी शाह, उद्घाटक प्रा.मेघा खारकर, प्रमुख अतिथी सौ.प्रतिभा चौरे,व्यवस्थापन मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य व

व्यासपीठावर उपस्थित सर्व मान्यवरांनी दीप प्रज्वलन व सरस्वती पूजन करून केली. चर्चासत्रासाठी उपस्थित सर्व मान्यवरांचा परिचय डॉ. के.डी. सोनवणे यांनी केला. चर्चासत्राचे अध्यक्ष मा. बाबासाहेब शरदचंद्रजी शाह यांचे स्वागत मा. प्राचार्य डॉ.अशोक पी.खैरनार यांनी केले.

उद्घाटक प्रा.मेघा खारकर, प्रमुख अतिथी सौ.प्रतिभा चौरे, व्यवस्थापन मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. के.डी.सोनवणे तसेच मंचावर उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत मा. प्राचार्य डॉ.अशोक पी.खैरनार यांनी केले. संयोजिका डॉ.प्रियंका सुलाखे यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक पी.खैरनार यांचे स्वागत यांनी केले.

चर्चासत्राचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.अशोक पी.खैरनार यांनी केले. उद्घाटकिय भाषण प्रा.मेघा खारकर यांनी केले. प्रा.मेघा खारकर यांनी स्त्रीचे विविध पैलू सांगितले. सर्वच क्षेत्रात काम करण्यासाठी महिलांनी स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास करणे महत्वाचे असते असे सांगितले. स्वतःचे अनुभव तसेच विविध उदाहरण देऊन व्यक्तिमत्वाचे महत्व सांगितले. चर्चासत्राच्या उद्घाटन सत्राचे अध्यक्षीय भाषण मा. बाबासाहेब शरदचंद्रजी शाह यांनी केले व आभार डॉ.प्रियंका सुलाखे यांनी व्यक केले.

११.०० वा. चर्चासत्राचे प्रथम सत्र सुरु झाले. या प्रथम सत्राचे अध्यक्ष प्रा.ज्योती वाकोडे होत्या व प्रमुख वक्त्या प्रा.मेघा खारकर होत्या. स्त्री व आरोग्य या विषयावर प्रा.मेघा खारकर यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. त्यांनी मार्गदर्शना सोबतच क्षयरोगा बद्दल विद्यार्थिनींमध्ये जागरूकता निर्माण केली. क्षयरोगाला गंभीर आजार न समजता त्याला कसे सामोरे जाऊ शकतो याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच एक कुटुंब एक झाड हि कल्पनेचे महत्व समजून संगितले व सर्वाना हि कल्पना आत्मसात करण्याचे आव्हान केले. अध्यक्षीय भाषण प्रा.ज्योती वाकोडे यांनी केले. या सत्राचे सूत्रसंचालन वाघमोडे पूजा परिचय वाघमोडे सीमा व आभार वाघमोडे कविता हिने व्यक केले.

१२.०० वा. चर्चासत्राचे दुसरे सत्र सुरु झाले. या दुसऱ्या सत्राचे अध्यक्ष डॉ.दिपाली पाटील होत्या व प्रमुख वक्त्या सौ.प्रतिभा चौरे होत्या. स्त्री भ्रुण हत्या या विषयावर सौ.प्रतिभा चौरे यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. समाजाचे विदारक व भयानक चित्र एकपात्री नाटकातून सदर केले. समाज आज कितीही पुढारला असेल तरी लोकांची स्त्री बद्दलची मानसिकता बदलली नाही म्हणूनच समाजात अनेक घटना समोर येतात. यासाठी सर्वांनी कुठंतरी पुढ यायला हवे असे आव्हान केले. अध्यक्षीय भाषण डॉ.दिपाली पाटील यांनी केले. या सत्राचे सूत्रसंचालन दहिते मंजुषा, परिचय पठाण रेनुमा व आभार खैरनार रोशनी हिने व्यक केले. दुपारी ठीक १.०० वाजता स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

ठीक १.३० वा. चर्चासत्राचे तिसरे सत्र सुरु झाले. या तीसऱ्या सत्राचे अध्यक्ष प्रा.राजश्री पाटील होत्या व प्रमुख वक्त्या प्रा.ज्योती वाकोडे होत्या. युवतीच्या समस्या व व्यक्तिमत्व विकास तसेच चिंता व ताणताणाव या विषयावर विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय प्रा.राजश्री पाटील यांनी केले या सत्राचे सूत्रसंचालन सोनवणे मयुरी, परिचय कापडे पूनम व आभार जगदाळे भाग्यश्री हिने व्यक केले.

ठीक ३.०० वा. चौथे सत्र आयोजित करण्यात आले. चौथे सत्र हे पेपर वाचनाचे होते. पेपर वाचानाकरिता १. महिला व नेतृत्व २. समाजपरिवर्तन व महिला ३. मुलगी वाचवा, मुलगी शिकवा ४.स्त्री आणि राजकारण ५..युवतींचा व्यक्तिमत्व विकास ६. Digital Literacy and Women Empowerment ७. Employbility, Adoptibility हे विषय देण्यात आले होते.

विद्यार्थिनीने अनुक्रमे या विषयावर ppt ने पेपर सादरीकरण केले. या पेपर वाचनाचे पंच डॉ.वसुमती पाटील व अध्यक्ष सौ.प्रतिभा चौरे होते. यातून अनुक्रमे तीन उत्कृष्ठ पेपर वाचकांना गौरव चिन्ह देण्यात आले. या सत्राचे अध्यक्षीय भाषण सौ.प्रतिभा चौरे यांनी केले. या सत्राचे सूत्रसंचालन जाधव अश्विनी, परिचय वाघ राधिका व आभार भदाणे पूजा हिने व्यक केले.

चौथ्या सत्रानंतर समारोप समारंभ कार्यक्रमास सुरुवात झाली. मंचावर समारोपकर्ते प्रा.अहिरे, प्रमुख अतिथी म्हणून प्रा. के.डी. सोनवणे व अध्यक्ष प्राचार्य डॉ.अशोक खैरनार, युवती विभाग समन्वयक डॉ.प्रियंका सुलाखे, ई. मान्यवर उपस्थित होते.

चर्चासत्रात सहभागी विद्यार्थिनीपैकी प्रातिनिधिक स्वरुपात काही विद्यार्थिनीनी चर्चासत्राबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. समारोपकर्ते प्रा.अहिरे यांनी चर्चासत्राबद्दल बद्दल आपले मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयात राबवण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांमुळे युवतीचा व्यक्तिमत्व विकास साधण्यात हाथभार लागतो, यामुळे मुली सक्षम बनतात असे सांगितले. अध्यक्षीय भाषण मा.प्राचार्य डॉ.अशोक खैरनार यांनी केले. या समारोप समारंभाचे सूत्रसंचालन राणे गायत्री व आभार भदाणे पूजा हिने व्यक केले.

*****

## एक दिवशीय राष्ट्रीय कार्यशाळा
## महिला सक्षमीकरणासाठी डिजिटल साक्षरता

## अहवाल - दि. २८.१२.२०१९

**प्रा. आतिष मेश्राम**

महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई व निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवशीय राष्टीय कार्यशाळा महिला सक्षमीकरणासाठी डिजिटल साक्षरता दिनांक २८/१२/२०१९ रोजी संपन्न झाली. प्रसंगी कवयित्री बहिणाबाई चौधरी व सरस्वती प्रतिमेचे पूजन त्याच बरोबर दीप प्रज्वलन कार्यशाळेचे उद्घाटक मा.श्रीमती जयश्री पाटील, सदस्य महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई, प्रमुख अतिथी मा.प्राचार्य पी.दि. देवरे, साक्री, निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व सन्माननीय संचालक मंडळ, विविध महाविद्यालयातील प्राचार्य, आदर्श कला महाविद्यालायाचे प्राचार्य व संयोजक मा.डॉ.अशोक पी. खैरनार आदी मान्यवरांच्या उपस्थितीत डिजिटल प्रशिक्षण कार्यशाळाचे उद्घाटन झाले. उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत मा.प्राचार्य डॉ.अशोक पी खैरनार यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले.

कार्यशाळेचे संयोजक तसेच महाविद्यालायचे प्राचार्य मा.डॉ.अशोक पी. खैरनार यांनी आपल्या प्रास्ताविकातून कार्यशाळेचा विषय व उपविषय यावर प्रकाश टाकला तसेच महाविद्यालयाच्या गौरवशाली वाटचालीची मान्यवरांना ओळख करून दिली. महिलांच्या सक्षमीकरणासाठी महाविद्यालयाने भरीव कामगिरी केल्याचे ते म्हटले. या कार्यशाळेसाठी एकंदरीत ३२० महिला सभासद उपस्थित होते.

उद्घाटक म्हणून लाभलेले श्रीमती मा.जयश्री पाटील, सदस्य महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांनी आपल्या वक्तव्यात म्हटले कि, ग्रामीण भागातील महिला या डिजिटल तंत्रज्ञानापासून फार अलिप्त आहेत त्यांना तंत्रज्ञान आत्मसात करता यावा कारण आज सर्वच क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर होत आहे म्हणून वेळो-वेळी डिजिटल साक्षरता शिबीर व कार्यक्रम आयोजित करण्याची गरज आहे हे लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांनी कार्यशाळेचे आयोजन करावे असे सूचित केले. जेणेकरून सर्व शिक्षित व अशिक्षित महिला देखील तंत्रज्ञान साक्षर होतील.

उद्‌घाटन कार्यक्रमाचे आभार मानून पुढिल सत्राची सुरुवात करण्यात आली.

प्रथम सत्राची सुरुवात मा.श्रीमती.जयश्री पाटील, सदस्य महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांचा वतीने करण्यात आली. या सत्रात महिला सभासदांची हजेरी Online पद्धतीने करण्यात आली यात अधक्ष्य मा.श्रीमती. विजया रहाटकर महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांचा एक Mobile Number ७८८७८१९८९४ हे सर्व सभासद महिलांच्या हजेरी करिता देण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये श्रीमती जयश्री पाटील यांनी सहभागी महिलांना डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करता यावा, डिजिटल तंत्रज्ञान काय आहे हे समजून घेणे , स्मार्ट फोन हाताळता येणे त्याचबरोबर डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपण घरीबसल्या कायद्याविषयक माहिती, माहितीच्या अधिकारांतर्गत हवी असलेली माहिती, आर्थिक व्यवहार, तक्रारी नोंदवणे व कागदपत्रे डिजिटल लॉकर मध्ये साठहून ठेवणे इत्यादी अनेक प्रकारचे उपयोगी Apps जसे भीम, उमंग, तेजस्वनी, नमो व आपले सरकार एप्सचा वापर करून करू शकता तसेच सरकारी वेबसाईट व प्रेरणादायक विडीयो दाखविण्यात आले. या कार्यशाळेचा उद्देश्य डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्रामीण व आदिवासी महिलांचे सक्षमीकरण करणे तसेच डिजिटल कौशल्य निर्माण करून आपल्या भारत देशाला डिजिटल साक्षर बनविणे होय.

दुसऱ्या सत्राची सुरुवात देखील मा.श्रीमती.जयश्री पाटील यांचा वतीने करण्यात आली त्यात काही महत्वपूर्ण Application Software (Apps) व Motivational Videos सांगितले व दाखविण्यात आले. या सत्रात भीम, उमंग, तेजस्वनी, नमो व आपले सरकार याची सविस्तर माहिती देण्यात आली त्याचबरोबर अध्यक्ष मा.श्रीमती. विजया रहाटकर महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांचा प्रेरणादायक संदेश विडीयोच्या माध्यमातून सर्व सभासद महिलांना दाखविण्यात आला. यानंतर अर्ध्या तासाचा भोजन अवकाश देण्यात आला.

तिसऱ्या सत्राताचे अध्यक्षीय स्थान मा.श्रीमती जयश्री पाटील, सदस्य महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई हे होते तर प्रमुख वक्ते मा.डॉ.डी.एस.चव्हाण, साक्री आणि मा.डॉ.मालीच्कर, साक्री होते. सरांनी डिजिटल साहित्य, सायबर क्राईम, संगणक व इंटरनेट संदर्भात महिलांना सविस्तर माहिती दिली त्याचबरोबर महिलांशी संवाद साधला आणि महिलांच्या प्रश्नाची उत्तरे दिली. सरांनी प्रशिक्षक म्हणून काम पहिले. उपस्थितात अश्विनी जाधव, शारदा खैरनार, राधिका वाघ, डॉ.वंदना पाटील व नम्रता बागले आदींनी सदर प्रशिक्षण कार्यशाळा बद्दलच्या भावना मांडल्या.

कार्यशाळेच्या समारोप समारंभाचे अध्यक्षीय स्थान आदर्श कला महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ. अशोक पितांबर खैरनार तर प्रमुख अथिती म्हणून मा.डॉ.विजय बच्छाव, साक्री हे उपस्थित होते.मा.प्राचार्य खैरनार सर म्हणाले की, मोबाईल चा वापर मनोरंजनापलीकडे जाऊन शिक्षणासाठी व जीवन विकासासाठी करता येतो. सदर प्रशिक्षणाचा उपयोग आपणही करा व मैत्रिणींनाही शिकवा.

जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगताची उद्धारी अशा माता भगिनींना आपल्या सक्षमीकरणासाठी डिजिटल प्रशिक्षण कार्यशाळा महत्वपूर्ण ठरणार आहे. कार्यशाळेच्या समारोपाचे प्रमुख अतिथी म्हणून मा.डॉ. विजय बच्छाव यांनी कार्यशाळा मोठ्या प्रमाणात यशस्वी झाली म्हणून समाधान व्यक्त केले व अशा प्रकारच्या महिलांविषयी कार्यशाळा शिक्षण क्षेत्रातील शाळा व महाविद्यालयात होत राहावे जेणेकरून महिलांना त्यांचे अधिकार, समानता त्याचबरोबर आधुनिक तंत्रज्ञानाविषयी जागृती करून साक्षरता वाढविता येईल. सदर कार्यशाळेचे

सूत्रसंचालन समन्वयक डॉ. प्रियंका सुलाखे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. के.डी. सोनवणे यांनी केले व आभार प्रा. आतिश मेश्राम यांनी केला. कार्यशाळेत एकूण २३७ सदस्यांनी सहभाग नोंदवला. सदर कार्यशाळेचे आयोजन प्रा. आतिश मेश्राम, प्रकल्प अधिकारी यांनी केले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर बंधू यांचे कार्यशाळा यशस्वीतेसाठी सहकार्य लाभले. आभार प्रदर्शनानंतर समारोप समारंभाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

*****

## कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका

### वार्षिक अहवाल - शै.वर्ष २०१९-२०

**डॉ. के.डी. सोनवणे**

**प्रा. ए.आर. इंगळे**

निजामपूर जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे आदर्श कला महाविद्यालय निजामपूर जैताणे येथे दरवर्षी कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी राबिवण्यात येते. याहि शैक्षणिक वर्षात २०१९-२० ला हि योजना यशस्वीपणे राबविण्यात आली. विद्यार्थ्यांची गुणवत्ता आणि पालकाचे उत्पन्न यावरून मा.प्राचार्य डॉ अशोक खैरनार यांच्या अध्यक्षतेखाली खालील विद्यार्थ्यांची निवड संवर्गनुसार करण्यात आली. निवळ झालेल्या विधार्थ्यांना सदर योजनेमार्फत ग्रंथालयात पुस्तकाची मांडणी करणे, झाडांना पाणी घालणे, मैदानाची साफ सफाई करणे इ. जबाबदारी देण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थांची नावे पुढील प्रमाणे

| अ. क्र | विद्यार्थ्याचे नाव | संवर्ग | वर्ग |
|---|---|---|---|
| १ | कु. जाधव अश्विनी अविनाश | एस.सी. | तृतीय वर्ष |
| २ | कु. राणे गायत्री अनिल | ओ.बी.सी. | तृतीय वर्ष |
| ३ | कु. गोसावी आरती राजेंद्र | एन.टी. | तृतीय वर्ष |
| ४ | कु. पठाण परवीनबानो जब्बारखा | ओपन | तृतीय वर्ष |
| ५ | वसावे सुनील दाजला | एस.टी. | तृतीय वर्ष |

*****

## म. गांधी विचार संस्कार परीक्षा

### वार्षिक अहवाल - शै.वर्ष २०१९-२०

**प्रा. यशवंत आर. कुलकर्णी**

म.गांधी विचार संस्कार परीक्षा अहवाल गांधी रिसर्च फाउंडेशन, जळगाव व नि.जै.शि.प्र.मंडळाचे आदर्श कला महाविद्यालय निजामपुर जैताणे यांच्या संयुक्त विद्यमाने निजामपूर येथील आदर्श कला महाविद्यालयात महात्मा गांधींच्या १५० व्या जयंती वर्ष औचित्याने दिनांक १७ ऑक्टोबर २०१९ रोजी महाविद्यालयात गांधी विचार संस्कार परीक्षा २०१९ चे आयोजन केले गेले. सदर परीक्षेस एकूण ४२ विद्यार्थी बसले. पैकी २९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. या परीक्षेत प्रथम वर्ष कला वर्गातून कुमारी जगदाळे छाया छोटू हिने ५३ गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. द्वितीय वर्ष कला वर्गात कुमारी जगदाळे पूनम सुनील हिने पंचेचाळीस गुण मिळवून प्रथम क्रमांक तर तृतीय वर्ष कला वर्गातून कुमारी जाधव अश्विनी अविनाश हिने ६७ गुण मिळवून महाविद्यालयात आणि धुळे जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला. या गांधीविचार संस्कार परीक्षेत महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. प्रविण बाबुराव मोरे यांनीही धुळे जिल्ह्यात प्रथम येण्याचा बहुमान मिळविला. सदर परीक्षेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर अशोक खैरनार यांचे मार्गदर्शन लाभले. सदर परीक्षा सुरळीत होण्यासाठी प्राध्यापक डॉक्टर विजय गजानन गुरव, प्राध्यापक प्रणव गंगाधर गरुड

आणि प्राध्यापक यशवंत रघुनाथ कुळकर्णी यांनी परीक्षेचे समन्वयन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर अशोक खैरनार यांनी तसेच महाविद्यालयातील संपूर्ण प्राध्यापक व प्राध्यापकत्तर वृंद यांनी केले. महाविद्यालयाचे अध्यक्ष मा.बाबासाो. ॲड. शरदचंद्र शाह यांनी सर्व परीक्षार्थीचे अभिनंदन केले.

*****

## Department of English

## Annual Report 2019-20

**Prin.Dr.Ashok Pitambar Khairnar**
**Head Department of English**
**Prof. A.R. Ingale (Asst. Professor)**

The following student oriented activities have been conducted in the academic year 2019-20 on behalf of Department of English.

**University Level Workshop :** Department of English, Adarsh college of Arts organized one day State Level Workshop on 'Interview Techniques and Confidence Building' on 11 February, 2020 at Conference Hall of the college. The Principal of S.G. Patil Arts, Commerce and Science college Sakri, Dr. R.R.Ahire was the guest of honor while the Chairman of Adarsh college of Arts, Nijampur - Jaitane Adv.Sharadchandra Jagannath Shah presided over the function. Dr. Tejesh Beldar from Nashik, Dr. Vijay Chaudhari and Dr. D. S. Chauhan were the resource persons of the workshop. There were four sessions in the workshop. 122 students were participated from different colleges in the workshop.

**Spoken English Course :** The department offered track course for the students college. Through the course, students are imported basic knowledge of English grammar, the technique of speaking English. The rural and tribal students are well trained. Prof.A.R.Ingle was the coordinator of the course.Prof.Dinesh Vasave delivered lectures on English grammar.

**Remedial Classes :** Department organized the remedial classes for S.Y and T.Y B.A students after III and V semester in the month of August of the academic year 2019-20.Slow learner are benefited by these classes.

**Bridge Course :** Department of English also offered Bridge Course for F.Y.B.A. students. It helps to fill the gap between two semesters. New students are acquainted with the English language and literature. The course also highlighted the importance of English and literature from the point of view of student's career.

**Students Participation in Aviskar :** The students of Department Misbah Shaikh (S.Y.B.A.), Patan Rahnuma (F.Y.B.A.) and Ashwini Jadhao (T.Y.B.A.) have participated in the district level Aviskar competitions organized by S.G.Patil College Sakri and Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra Jalgaon. All students are excelled in the district level competitions and obtained an opportunities to present their research posters in university level round at Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra Jalgaon.

**Organization of Add-on Course :** The department introduced students the add on course on 'An Introductory Course for students of Literary Studies' Dr.D.S.Chavhan from S.G.Patil college Sakri and Dr.Jahagirdar Salunkhe From VImaltai College Sakri were experts for the course. The syllabus of the course are covered in the month of July,2020.

**Participation of Essay Competition :** Department students Miss Misbah Shaikh (S.Y),Wagh Radhika (T.Y),Rahnuma Bano Pathan (F.Y) participated in University Level Essay Competition organized by G.T.Patil college Nandurbar. Shaikh Misbah was awarded Consolation Prize in the competition

*****

## हिन्दी विभाग व वैयक्तिक

## वार्षिक अहवाल - शै.वर्ष २०१९-२०

**डॉ. विजय ग. गुरव**

**(हिन्दी विभाग)**

दि. १५ जून २०१९ पासून नविन शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ झाला. प्रथम दिनी मा.प्राचार्य डॉ. अशोकजी खैरनार यांच्या दालनात सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर वृंद सोबत बैठक घेऊन शैक्षणिक वर्षाचे नियोजन समजवून सांगण्यात आले.

दि. २१ जून २०१९ संस्थेचे सर्व सन्माननीय सदस्य, प्राध्यापक, प्राध्यापकेतर वृंद सोबत योग वर्गात योगाभ्यास केला.

दि. १५ ऑगस्ट २०१९ स्वातंत्र्य दिन व मनोरंजनात्मक कार्यक्रमात सहभाग घेतला.

दि. २० ऑगस्ट २०१९ रोजी कला, वाणिज्य महाविद्यालय, नगांव (धुळे) येथे द्वितिय वर्ष कला पुनर्गठित अभ्यासक्रमात सहभाग नोंदविला.

दि. २७ ऑगस्ट २०१९ आदर्श कला महाविद्यालयाचे अध्यक्ष मा. बाबासाो. शरदचंद्रजी शाह यांच्या जन्म दिनानिमित्त महाविद्यालयाने आयोजित रक्तदान शिबिरात सहयोग दिला.

दि. १४ सप्टेंबर 'हिन्दी दिवस' निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन केले. करिता डॉ. अनन्त पाटील, उपप्राचार्य सि.गो. पाटील महाविद्यालय, साक्री यांनी हिन्दी भाषेचे महत्त्व, आवश्यकता सांगितली.

दि. २४ सप्टेंबर २०१९ एन.एस.एस. दिन कार्यक्रमात प्रत्यक्ष सहभाग व उपस्थिती नोंदविली.

दि. १ नोव्हेंबर २०१९ पासून सुरु विद्यापीठ स्तरीय प्रथम, द्वितीय, तृतिय परिक्षेत परिक्षा अंतर्गत प्रमुख, कनिष्ठ पर्यवेक्षक म्हणून परिक्षा समाप्ति पर्यंत काम पाहिले.

दि. २०, २१, २२ नोव्हेंबर २०१९ प्रथम वर्ष कला शाखेचे पेपर्स तपासले व गुणदान याद्या भरून तयार केल्या. कार्यालयात जमा केल्या.

दि. २५ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर २०१९ विद्यापीठ स्तरीय परिक्षेचे वरिष्ठ अंतर्गत परीक्षा प्रमुख म्हणून महाविद्यारयात काम पाहिले.

दि. २० ते २६ डिसेंबर २०१९ एन.एस.एस. कॅम्प उद्घाटन व समारोप प्रसंगी उपस्थिती नोंदविली.

दि. २८ डिसेंबर २०१९ महाविद्यालयात आयोजित 'Comman Impowerment workshop' एक दिवसीय वर्कशॉप मध्ये प्रत्यक्ष सहभाग नोंदवला.

दि. ३० डिसेंबर २०१९ सि.गो. पाटील महाविद्यालय, साक्री आयोजित विद्यापीठस्तरीय कार्यक्रमात आविष्कार २०१९-२० सहभाग घेतला.,

दि. ३१ डिसेंबर २०१९ ते ८ जाने. २०२० विधी महाविद्यालय, नंदुरबार येथे विद्यापीठस्तरीय परीक्षेत वरिष्ठ परिक्षा पर्यवेक्षक म्हणून काम केले.

दि. १० व ११ जानेवारी २०२० कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, पाचोरा येथे आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात 'गुडीया भीतर गुडीया : आत्मकथा' विषयावर पेपर प्रस्तुत केला.

दि. २६ जानेवारी २०२० ज्ञानपीठ प्रतिष्ठान व महिला महाविद्यालय, नंदुरबार आयोजित प्रकाशित पुस्तिकेत '२१ वी शती का उपन्यास साहित्य' या विषयावर पेपर प्रकाशित केला.

दि. ११ फेब्रुवारी २०२० इंग्रजी विभागातर्फे आयोजित युनिव्हर्सिटी व स्टेट लेव्हल चर्चासत्रात प्रत्यक्ष सहभाग नोंदवला.

दि. १५ फेब्रुवारी २०२० कला, वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात उपन्यास या विषयावर पेपर प्रस्तुत केला.

*****

## मराठी विभाग

# वार्षिक अहवाल - शै.वर्ष २०१९-२०

**डॉ. रविंद्र ठाकरे**

**(मराठी विभाग)**

शैक्षणिक वर्ष २०१९ २० या वर्षाचा मराठी विभागाचा अहवाल सादर करताना मनस्वी आनंद होत आहे. महाविद्यालयाची या शैक्षणिक वर्षाची सुरुवात १५ जून २०१९ पासून झाली. महाविद्यालयात मराठी विभाग महाविद्यालयाच्या स्थापनेपासून कार्यरत आहे. या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयात प्रथम वर्ष कला वर्गात वांग्मय मराठीसाठी ७७ तर उपयोजित मराठी साठी १४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. द्वितीय वर्ष कला वर्गात स्पेशल स्तरावर सोळा विद्यार्थी तर जनरल विषयासाठी ४८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. तृतीय वर्ष कला वर्गात स्पेशल साठी ११ विद्यार्थ्यांनी तर जनरल साठी ४० विद्यार्थ्यांनी प्रवेश नोंदविला. महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व अध्ययन पूर्तीसाठी वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. त्यात विविध स्पर्धा परीक्षांसाठी, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी त्यांच्या वाचनसंस्कार रुजविण्यासाठी विभागाच्यावतीने प्रयत्न केले जातात. महाविद्यालयाच्या विशाल ग्रंथसंपदेतून त्यांचा विकास कसा साधता येईल यासाठी मराठी विभागातील विभाग प्रमुख डॉक्टर रवींद्र पोपटराव ठाकरे व प्राध्यापक यशवंत रघुनाथ कुलकर्णी यांचे प्रयत्न सुरू असतात. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर माननीय अशोक खैरनार यांचे कुशल मार्गदर्शन व प्रेरणा विभागाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना तसेच विविध महाविद्यालयात नेतृत्व विकास कार्यशाळा यांसाठी विद्यार्थ्यांना सतत प्रोत्साहित केले जाते. मराठी विभाग प्रमुख डॉक्टर रवींद्र पोपटराव ठाकरे यांनी १७ मार्च २०२० नंतरच्या covid-१९ च्या जागतिक संकटात लॉक डाउन काळात विविध ऑनलाइन वेबिनार मध्ये सक्रिय सहभाग नोंदवला. त्यात ऑनलाइन मराठी साहित्य वाचन राष्ट्रीय चाचणी स्पर्धेत सरदार वल्लभ भाई पटेल कला विज्ञान महाविद्यालय ऐनपुर येथे दिनांक १४ मे २०२० रोजी सहभाग नोंदवला. मराठी भाषा मंडळ वतीने दिनांक २० मे २०२० रोजी शंकर नारायण कला विज्ञान महाविद्यालय भाईंदर ठाणे येथे म्हणीनवर आधारित कार्यक्रमात सहभाग नोंदवला. याच दिवशी covid-१९ प्रश्नमंजुषा, कला विज्ञान महाविद्यालय, नूतन मराठा कॉलेज जळगाव येथे आपला सहभाग नोंदविला. दिनांक २७,२८ मे २०२० रोजी राष्ट्रीय वेबिनार जी डी बेंडाळे महाविद्यालय जळगाव येथेही सहभाग नोंदविला. विमल बाई पाटील कला विज्ञान महाविद्यालय साक्री येथे 'डिजिटल हुम्यानिटीज' विषयावर आयोजित कार्यक्रमात ३० मे २०२० रोजी सक्रिय सहभाग नोंदविला. कला विज्ञान महाविद्यालय, मकानी उस्मानाबाद येथे 'मराठी साहित्य प्रभावाची २००० नंतरची स्थिती गती विषयावर आयोजित चर्चासत्रात ऑनलाइन सहभाग नोंदविला. दिनांक २५ जुलै २०२० रोजी विमलबाई उत्तमराव पाटील कला विज्ञान महाविद्यालय, साक्री येथे आयोजित 'भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा पुढील आव्हाने गलवान खोरे संदर्भात' या चर्चासत्रात ऑनलाईन सहभाग नोंदविला. जवाहर कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय, अनादुर (उस्मानाबाद) येथे 'इम्पॉर्टन्स ऑफ डिजिटलायझेशन ऑनलाइन डॉक्युमेंटेशन फोर नॅक' या विषयाच्या चर्चा सत्रासाठी ऑनलाइन सहभाग नोंदविला. दिनांक ३० जुलै २०२० रोजी श्रीमती सुशीला देवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय लातूर येथील 'डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन इन एज्युकेशन एटीट्यूड क्लासरूम अँड लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीम' या ऑनलाइन चर्चासत्रात सहभाग नोंदविला. त्याचप्रमाणे

निजामपुर जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आदर्श कला महाविद्यालय निजामपुर जैताणे आयोजित ऑनलाइन चर्चासत्र 'इंटलेक्चुअल प्रॉपर्टी राइट्स अँड चॅलेंजेस' या दिनांक २१ ऑगस्ट २०२० रोजी आयोजित चर्चासत्रात सहभाग नोंदविला. विभागातील प्राध्यापक यशवंत कुलकर्णी यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे आयोजित अविष्कार स्पर्धेत दिनांक ३१ डिसेंबर २०२० रोजी साक्री येथील सि गो पाटील महाविद्यालयात सक्रिय सहभाग नोंदविला. तदनंतर दिनांक आठ जानेवारी २०२० रोजी कवयत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ येथील अविष्कार फेरीत त्यांचा सक्रिय सहभाग नोंदविला गेला. याशिवाय covid-१९ काळात विविध चर्चासत्रात सहभाग नोंदविला महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी मराठी विभाग सतत प्रयत्नशील असतो. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर अशोक पितांबर खैरनार यांचे मार्गदर्शन व महाविद्यालयाचे अध्यक्ष आमचे प्रेरणास्थान अ‍ॅड. बाबासाहेब शरदचंद्र शाह यांचा आशीर्वाद निश्चितच आम्हाला महत्त्वपूर्ण असतो.

*****

## समाजशास्त्र विभाग

## वार्षिक अहवाल - शै.वर्ष २०१९-२०

**डॉ. सुधाकर लोटन जाधव**

**(समाजशास्त्र विभाग प्रमुख)**

निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आदर्श कला महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाचा वार्षिक अहवाल देत असतांना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे.

शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी जून महिन्यात समाजशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सु.लो. जाधव व प्रा. किशोर वसंतराव सोनवणे यांनी मा. प्राचार्यांच्या आदेशाने माळमाथा परिसरातील इयत्ता बारावी पास झालेल्या विद्यार्थ्यांच्या घरोघरी जाऊन त्यांना महाविद्यालयीन प्रवेशासाठी प्रवृत्त केले. समाजशास्त्र विभागाच्या त्या प्रयत्नांमुळे या परिसरातील आदिवासी व ग्रामीण विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन प्रवेशाची संधी मिळाली.

शैक्षणिक कामकाज करीत असतांना राष्ट्रीय कार्यात सहभाग असावा म्हणून विभागाने नेहमीच विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. विभागाच्या वतीने दि. ३ जानेवारी २०२० रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मरणासाठी प्राचार्य डॉ. अशोक पितांबर खैरनार यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले. सामाजिक उपहासातूनही ज्ञानाची प्राप्ती करणाऱ्या सावित्रीबाई सारखे आपणही शिक्षण घेवून सक्षम व्हा व स्वतःला सिद्ध करा असे उद्‌गार मा. प्राचार्यांनी काढले. सदर कार्यक्रमास समाजशास्त्र विभागाच्या सर्व विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली.

आदर्श महाविद्यालयात आदमासे ४०% विद्यार्थी हे आदिवासी समाजातील असून अशा विद्यार्थ्यांना आदिवासी क्रांतीकारकांचे स्मरण व्हावे म्हणून दि. ९ ऑगस्ट २०२० रोजी प्रा. किशोर वसंतराव सोनवणे यांचे 'आदिवासी समाजातील क्रांतीकारक' या विषयावर व्याख्यान आयोजित केले. सदर व्याख्यानास महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी आपली उपस्थिती दर्शविली.

शैक्षणिक वर्षाच्या शेवटी दि. १७ मार्च पासून कोरोना विषाणूचा प्रादुर्भावामुळे ऑनलाईन पद्धतीने होणाऱ्या परीक्षांना समाजशास्त्र विभागाच्या सर्व विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध व्हावी म्हणून डॉ. सु.लो. जाधव व डॉ. किशोर सोनवणे यांनी सर्वोतोपरी प्रयत्न करून परीक्षा विभागास सहकार्य केले.

**प्रा. किशोर सोनवणे (समाजशास्त्र विभाग)**

शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० या वर्षी समाजशास्त्र विभागाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे उपक्रमाचे आयोजन केले जात असते. आदर्श विद्या मंदिर ज्यू कॉलेज येथे २

ऑक्टोंबर रोजी महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. त्या ठीकाणी प्रमुख वक्ता म्हणून या दोन्ही महापुरुषांच्या जीवन चरित्रावर विचार मांडण्यात आले. ९ ऑगस्ट हा जागतिक आदिवासी दिवस साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय आदिवासी समाज जीवन व त्यांचे निसर्गाशी असलेले नाते याविषयी कार्यक्रम घेण्यात आला. त्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आपल्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक खैरनार होते तर विभाग प्रमुख प्रा.डॉ. सुधाकर जाधव यांनी कार्यक्रमाची पार्श्वभूमी मांडली व प्रमुख वक्ता म्हणून प्रा. किशोर सोनवणे यांनी आदिवासीचे सर्वांगीण व त्यांचे निसर्गाशी असलेले नाते या कार्यक्रमातून आदिवासींची ओळख करून दिली. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठाच्या वतीने सि. गो. पाटील महाविद्यालयात ३० डिसेंबर २०१९ आविष्कारचे आयोजन करण्यात आले होते. त्या ठिकाणी महुच्या फुलांचे फायदे या विषयी पोष्टर प्रदर्शन करण्यात आले. त्या टीकाणी विद्यापिठ स्तरावर निवड झाल्यावर दि. ८ जानेवारी २०२० रोजी क.ब.चौ. उ.म.वि. जळगांव येथे प्रदर्शन करण्यात आले. अभ्यासक्रम पुनर्रचना कार्यशाळा तळोदा येथे सहभाग. त्याच प्रमाणे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुण विकसित करण्यासाठी विविध प्रश्न मंजुषा, संवाद, आपसात गटचर्चांचे आयोजन केले जाते. तसेच बदलत्या शिक्षण धोरणानुसार ICT च्या माध्यमातून शिकविले जाते.

*****

## राज्यशास्त्र विभाग

## वार्षिक अहवाल - शै.वर्ष २०१९-२०

**डॉ. के.डी. सोनवणे**

**(राज्यशास्त्र विभाग)**

आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे येथे राज्यशास्त्र हा विषय विशेष स्तरावर शिकविला जात आहे. दरवर्षी राज्यशास्त्र विभागामार्फत स्पर्धा परीक्षा, गटचर्चा घेतली जाते. १२ वी उत्तीर्ण होऊन जे विद्यार्थी येतात त्या विद्यार्थ्यांना राज्यशास्त्र विषयाचे ज्ञान व्हावे, भारतीय संविधानाची ओळख व्हावी, पाश्चिमात्य विचारवंतांची माहिती मिळावी म्हणून जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात ब्रिज कोर्स घेतला जातो. तसेच जे विद्यार्थी राज्यशास्त्र विषयात मागे अस्तात. अशा द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी जुलै व जानेवारी महिन्यात रेमेडियल कोर्स घेतला जातो. तसेच राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. के.डी. सोनवणे हे संशोधनाचे कार्य करीत असतात. यावर्षी त्यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव येथे 'भारतीय समाजवाद, तत्व व व्यवहार एक अभ्यास' या विषयावर शोध प्रबंध सादर केला होता. म्हणून विद्यापीठामार्फत त्यांना विद्या वाचस्पती (पीएच्.डी.) ही पदवी प्रदान करण्यात आली. तसेच डॉ. के.डी. सोनवणे यांनी आपले विविध विषयाचे संशोधन पेपर सादर केले आहेत.

आठवले समाजकार्य महाविद्यालय, भंडारा येथे दि. ५ सप्टेंबर २०१९ रोजी 'मानवाधिकार व महिला' या विषयावर पेपर सादर केला.

कला व वाणिज्य पदवी महाविद्यालय, भंडारा येथे दि. १० ऑक्टोबर २०१९ रोजी राष्ट्रीय चर्चासत्र घेण्यात आले. त्यात 'महात्मा गांधीजींच्या विचारांची प्रासंगिकता' या विषयावरर पेपर सादर केला.

आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे येथे दि. २८ डिसेंबर २०१९ रोजी राष्ट्रीय चर्चासत्रात 'महिला सबलीकरण व डिजीटल इंडीया' या विषयावर पेपर सादर केला.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे दि. १० व ११ जानेवारी २०२० रोजी राष्ट्रीय चर्चासत्र घेण्यात आले. त्यात 'भारतीय स्त्रीवादाचा उदय व विकास' या विषयावर पेपर सादर केला.

पी.ओ. नाहाटा महाविद्यालय, भुसावळ येथे दि. ४ फेब्रुवारी २०२० रोजी राष्ट्रीय चर्चासत्र घेण्यात आले. त्यात त्यांनी 'हिंद स्वराज्य व आजचा भारत' या विषयावर पेपर सादर केला.

तसेच आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे येथे महिला आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत 'Digital Literacy for Women Empowerment' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र घेण्यात आले. त्या चर्चासत्राचे त्यांनी Joint Organisation Secretary म्हणून काम पाहिले व या विषयावरील पुस्तकाचे ते संपादक सदस्य आहेत. अशाप्रकारे विविध कार्य राज्यशास्त्र विभागामार्फत दरवर्षी आयोजित केले जातात.

*****

## संरक्षण आणि सामरिक शास्त्र

## वार्षिक अहवाल - शै.वर्ष २०१९-२०

**डॉ. प्रविण बाबुराव मोरे**

**(संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभाग)**

शैक्षणि वर्ष २०१९-२० या वर्षाचा संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभाग व वैयक्तिक अहवाल सादर करतांना मनस्वी आनंद होत आहे. प्रथम वर्ष कला शाखेसाठी भारतीय युद्धकला, द्वितीय वर्ष कला शाखेसाठी भारताची अंतर्गत सुरक्षा व तृतीय वर्ष कला शाखेसाठी जागतिक सुरक्षा हा अभ्यासक्रम देण्यात आला. प्रथम सत्राचा अभ्यासक्रम पूर्ण करून विद्यार्थ्यांकडून महाविद्यालय स्तरावर सराव परीक्षा घेण्यात आली. ३० डिसेंबर २०१९ रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांच्या वतीने आविष्कार २०१९ चे आयोजन करण्यात आले होते. त्यात संरक्षण शास्त्र विभागातील दोन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. नाना गोयकर व गायत्री यांनी या विषयावर रिसर्च पेपर सादर केला.

३० डिसेंबर २०१९ रोजी प्रा. प्रविण मोरे यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या वतीने आविष्कार २०१९ चे आयोजन सि.गो. पाटील महाविद्यालय, साक्री येथे आयोजन करण्यात आले होते. त्यात प्रा. मोरे यांनी 'नक्षलवादाचा अंतर्गत सुरक्षेवर होणारा परिणाम' या विषयावर रिसर्च पेपर सादर केला.

दि. ७ फेब्रुवारी २०२० रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव व धनदाई माता एज्युकेशन सोसायटी संचलित आर्ट आणि सायन्स महाविद्यालय, अमळनेर यांच्या वतीने आयोजित एक दिवसीय One Day Syllabus Restructuring workshop मध्ये सहभाग.

दि. ३० मे २०२० रोजी श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील आर्टस व कै.डॉ. भास्कर सदाशिव देसले सायन्स महाविद्यालय, साक्री जि. धुळे आयोजित नॅशनल वेबिनार मध्ये सहभाग.

जून २०२० "Spit Free India Movement" COVID-१९ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव व महाराष्ट्र शासन आयोजित ऑनलाईन कार्यक्रमात सहभाग.

"नक्षलवादी चळवळीचा भारताच्या अंतर्गत सुरक्षेवर झालेल्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास" या विषयावर पीएच्.डी. प्रबंध सादर केला व २४ जानेवारी २०२० रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव कडून आदरणीय कुलगुरू डॉ. पी.पी. पाटील यांच्या हस्ते दि. २४ जानेवारी २०२० रोजी नोटीफिकेशन (अधीसूचना पत्र) देण्यात आले.

दि. ५.०५.२०२० रोजी Covid-१९ Awareness Quiz मध्ये सहभाग घेतला. याचे आयोजन MVP Samaj's आर्ट आणि कॉमर्स

कॉलेज तहाराबाद ता. बागलाण जि. नाशिक यांनी केले होते.

दि. ११.०५.२०२० रोजी श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ. भास्कर सदाशिव देसले सायन्स महाविद्यालय आयोजित Quiz on Great Indian Social Reformers हिंदी व मराठी विभागाने आयोजन केले होते. त्यात ऑनलाईन सहभाग.

दि. १५.०२.२०२० रोजी अजंठा एज्युकेशन अॅड मिलीटरी प्रिपरेटरी इन्स्टिट्युट संचलित इंद्रराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सिल्लोड जि. औरंगाबाद आयोजित सामान्यज्ञान स्पर्धेत सहभाग व ई-प्रमाणपत्र प्रदान.

दि. २२ मे २०२० रोजी स्वामी रामानंदतिर्थ महाविद्यालय, अंबाजोगाई आयोजित National Level Webinar मध्ये सहभाग.

दि. २८ जून २०२० रोजी आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे ता. साक्री जि. धुळे आयोजित Online National Webinar मध्ये सहभाग.

दि. ३० जून २०२० रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव व गवरमेंट ऑफ महाराष्ट्र हायर अॅण्ड टेक्नीकल एज्युकेशन डिपार्टमेंट नॅशनल लेव्हल सेमिनारमध्ये सहभाग.

"गांधी विचार संस्कार परीक्षा" वर्ष २०१९ मध्ये आयोजित धुळे जिल्हास्तरीय प्राध्यापकांसाठी आयोजित परीक्षेत धुळे जिल्ह्यातून प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्याबद्दल सुवर्णपदक व प्रमाणपत्र देवून सन्मानीत करण्यात आले.

सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनिय कार्याबद्दल संथागार मैत्री संघ, धुळे यांच्याकडून दि. २२ फेब्रुवारी २०२० रोजी संथागारर मैत्री संघाकडून सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

*****

# भूगोल विभाग

## वार्षिक अहवाल - शै.वर्ष २०१९-२०

**प्रा.डॉ. विजय साहेबराव भामरे**

**(भूगोल विभाग)**

शैक्षणिक वर्ष २०१९-२० या वर्षाचा भूगोल विषयाचा विभागाचा तथा वैयक्तिक अहवाल सादर करतांना मनस्वी आनंद होत आहे. भूगोल या विषयासाठी आदर्श कला महाविद्यालय सामान्य स्तरावर अध्ययन केले जाते. त्यास्तव प्रथम वर्ष कला व गति भूगोल सामान्य या विषयासाठी ११३ विद्यार्थी प्रवेशित झाले. द्वितीय वर्ष कला सामान्य भूगोल या विषयासाठी ३९ विद्यार्थी प्रवेशित झाले. तर तृतीय वर्ष कला सामान्य भूगोल या विषयासाठी ३२ विद्यार्थी प्रवेशित झाले. प्रवेशित विद्यार्थ्यांनी नियमितपणे तासिका अटेन्ड करून चांगली उपस्थिती दर्शविली.

भूगोल या विषयासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव च्या अभ्यास मंडळाने प्रथम वर्ष कला भूगोल या विषयासाठी प्राकृतिक भूगोल I व II हा पेपर लावलेला आहे तसेच द्वितीय वर्ष कला सामान्य भूगोल या विषयासाठी प्रथम सत्रास सामान्य नकाशाशास्त्र तर दुसऱ्या सत्रासाठी मानवी भूगोल हे पेपर लावण्यात आले होते. तर तृतीय वर्ष कला सामान्य भूगोल या विषयासाठी प्रथम सत्रास राजकीय भूगोल तर दुसऱ्या सत्रासाठी लोकसंख्या भूगोल हा पेपर लावण्यात आलेले आहेत.

विद्यापीठने केलेल्या मार्गदर्शक नियमांनुसार सदर शैक्षणिक वर्षात वरील विषयांचे अध्ययन नियमितपणे तसेच सुरळीतपणे करण्यात आले. या दरम्यान विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम राबवण्यात आले. त्यात गटचर्चा तसेच परिसरात असलेल्या पवनऊर्जा, सौरऊर्जा या प्रकल्पांविषयी माहितीपर चर्चासत्र अशा उपक्रमांचा समावेश होता.

दि. ३१ डिसेंबर २०१९ रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव व सि.गो. पाटील महाविद्यालय, साक्री यांच्या संयुक्त विद्यमाने संशोधनासाठी चालना देणारा आविष्कार हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात आदर्श कला महाविद्यालयातील भूगोल विभागाच्या वतीने पोस्टर प्रदर्शन या कार्यक्रमात विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यात तृतीय वर्ष कला वर्गातील ठाकरे राम जेजीराम व संदीप जाधव या विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रदर्शन केले.

वरील सर्व उपक्रम तसेच अध्ययनाच्या माध्यमातून शैक्षणिक वर्ष २०१९-२० पूर्ण झाले.

*****

## प्रवेश समिती

## वार्षिक अहवाल - शै.वर्ष २०१९-२०

**प्रा.डॉ. विजय साहेबराव भामरे**

शैक्षणिक वर्ष २०१९-२० या वर्षाचा प्रवेश समितीचा अहवाल सादर करतांना विशेष आनंद होत आहे. या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयात एकूण ३३७ विद्यार्थी प्रवेशित झाले. त्यात प्रथम वर्ष कला या वर्गासाठी १५५ विद्यार्थी प्रवेशित झाले. द्वितीय वर्ष कला या वर्गात १०१ विद्यार्थी प्रवेशित झाले तर तृतीय वर्ष कला या वर्गात ८१ विद्यार्थी प्रवेशित झाले. सदर प्रवेश प्रक्रीया जून २०१९ पासून १० ऑगस्ट २०१९ पर्यंत सुरु होती.

प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्यांना विषय निवडीच्या संदर्भात मार्गदर्शन व्हावे या दृष्टीने विषय निवडीच्या सूचना असलेले माहिती पुस्तक विद्यार्थ्यांसाठी पुरवण्यात आले होते. तसेच या व्यतिरिक्त महाविद्यालयात अध्यापन केल्या जाणाऱ्या विषयांची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना मिळावी यासाठी प्राध्यापकांची एक समिती गठीत करून त्या समितीद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते.

महाविद्यालयात शिकवल्या जाणाऱ्या सामान्य स्तरावरील विषय व विशेष स्तरावरील विषय यांची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देऊन त्यांच्या इच्छेने विषय निवडून शैक्षणिक वर्ष २०१९-२० ची प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली.

*****

## क्रीडा विभाग

## वार्षिक अहवाल - शै.वर्ष २०१९-२०

**डॉ. प्रियंका सुलाखे**

**(क्रीडा विभाग)**

शैक्षणिक वर्ष २०१९-२० दरम्यान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी खो-खो मैदानी स्पर्धा, कबड्डी, कुस्ती, भारोत्तोलन यासारख्या विविध क्रीडा स्पर्धेत सहभाग नोंदवला व उत्कृष्ट प्रदर्शन केले. मैदानी स्पर्धेतील १०० मि. धावणे या क्रीडा प्रकारात उत्कृष्ट प्रदर्शन करून दुसरा क्रमांक आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत पटकावला. तसेच आंतर विभागीय स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवला. ५००० मि. धावणे या क्रीडा प्रकारात पावरा केशव याने तृतीय क्रमांक आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत मिळवला. विद्यापीठस्तरीय क्रीडा महोत्सवात वसावे लक्ष्मी वनसिंग हिची १०० मि. धावणेसाठी निवड झाली होती. आंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेत खैरनार कल्याण याने उत्कृष्ट प्रदर्शन करून प्रथम क्रमांक पटकावला व त्याची आंतर विभागीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. खलाणे अंकुश याने शक्तीतोलन आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत चतुर्थ क्रमांक मिळवला. विद्यार्थ्यांमधील खेळाडूंना त्यांच्या गुणांना वाव मिळावा. म्हणून २७.०८.२०१९ रोजी आंतरकुल स्पर्धा घेण्यात

आली. दि. २९.०८.२०१९ रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन विविध स्पर्धांचे आयोजन करून साजरा करण्यात आला. खेळाडूंमधील विविध खेळांसंबंधीचे कौशल्य अधिक विकसित व्हावे यासाठी २२.०८.१९ ते ३०.०८.१९ दरम्यान Physical Fitness Camp आयोजित करण्यात आला. खेळात कमकुवत असणाऱ्या खेळाडूंचा सराव होवून कौशल्यात सुधारणा व्हावी म्हणून ४.०२.२० ते १५.०२.२० दरम्यान Training Camp for slow learner आयोजित करण्यात आले. दि. १७.०२.२० रोजी Online Quiz चे आयोजन करण्यात आले. कु. अश्विनी अविनाश जाधव या विद्यार्थीनीने क्रीडा विभागामार्फत ६ महिन्याचा कालावधीत संशोधन प्रबंध "Effect of skipping on vormax among females in rural area" या विषयावर सादर केला. यामुळे या विद्यार्थीनीला रूक्मीणी नारायण बेडसे पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. कु. राणे गायत्री व कु. अश्विनी जाधव या विद्यार्थीनींनी आंतर महाविद्यालयीन आविष्कार स्पर्धेत संशोधन निबंध सादर करून त्याचे उत्कृष्ट सादरीकरण केले. या आधारावर या विद्यार्थीनीची निवड विद्यापीठ स्तरीय आविष्कार स्पर्धेसाठी झाली. विद्यापीठ स्तरावर ही उत्कृष्ट पेपर सादरीकरण केल्यामुळे स्टेट लेव्हल साठीच्या फेस-I साठी यांची निवड करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या या सर्व क्षेत्रातील प्रदर्शनासंदर्भात व यशासाठी नि.जै.शि.प्र. मंडळाच्या सर्व सन्माननीय व्यवस्थापन मंडळ सदस्य, आदर्श कला महाविद्यालयाचे अध्यक्ष ॲड्. बाबासाो. शरदचंद्रजी शाह, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार, शा.शि. संचालिका डॉ. प्रियंका सुलाखे, सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर बंधूंनी कौतुक केले.

*****

# Library Report - 2019-20

**Prof.Atish Shivshankar Meshram**
**Librarian**

**Library :** Library is a heart of any academic college. Library is a Knowledge Resource Center. The library is the bottom of support for the entire of Academic Activities on the Educational institutions. There are some major part of the library that is information resources, users and library staffs.

**Adarsh College Library :**

College is affiliated to Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon and was establishment in August12, 1995. Basically, the importance of education was convinced and percolates up to the grassroots level in the rural, tribal and hilly area through consistent efforts of Our College. College Libraries provides quality information of relevance to college education.College Library provides books, journals as well as update faculty and students on current happening in subjects that are offered and topics that are covered in the syllabus.College Library is the backbone of any Educational Institution. Higher education was started and contributed in Nijampur-Jaitane village by Members of Nijampur Jaitane Shikshan Prasarak Mandal and College President Adv.Sharadchandra J. Shah.

Our college library is computerized with Library Manager Software. Library software provides acquisition, circulation and OPAC facility for users to searching the books. Library has Internet facility with Wi-Fi enabled. E-resources database of National Library and Information Services (N-List) is

subscribed for users to access full text information related to area or subjects. There were 230 users active in N-List portal. Library having enough information resources available in print format like books, journals, periodicals, reference books, bounded volumes and competitive books as well as some electronic resources available on CD format. CCTV security system has been use in library on 24/7. Reading room facility with fan, light and extended time hours for study to the students. Library provide services as well as few best practices like open access, issue-return,User Orientation, Exhibition, Suggestion Box, Motivational and Cooperative Service, Display Competitive News, New Arrivals like Journals, General Books, Book Bank Scheme, Inter Library Loan, Reading Habits, Online Services through College Library WhatsApp Group and User Feedback etc. It is very small unit but important unit of the institution. The mission of the library is to fulfill the goals of the institution by providing qualitative services. Following are few best practices conducted every year to inculcate reading habits in students to improve their performance and involve students in collection development. Library Advisory Committee holds meeting at regular intervals to contribute and ensure the smooth functioning of the development of Library.

**Highlighted Worksof Library**

- Library area including Reading Room: 57.71sq.m
- Existing Equipment like - 27 Chairs, 21 Desks, 03 Tables, 15 Cupboards, 01Notice board and 02 Display board, 01 Rack for display Journals/Periodicals and 03 Personal Computer
- Existing total library books stock – 6893
- Total purchased books in 2019-20- 251
- Total expenditure on books in 2019-20 -/-35871
- Total Journals and Periodical with expenditure in 2019-20 -16 (7968/-)
- Total Newspapers – 06
- Total donated books – 1528
- Subscribed N-List Database

*****

## सांस्कृतिक अहवाल

### शै. वर्ष २०१९-२०२०

**प्रा. अजबराव इंगळे**

निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे आदर्श कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी विविध कार्यक्रमांमध्ये सहभाग घेण्यासाठी सांस्कृतिक समितीकडून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात आले. खालील कार्यक्रमांमध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या सहभाग नोंदविला.

**सांस्कृतिक कार्यक्रम व पारितोषिक वितरण सोहळा -** दि. २५.०१.२०२० रोजी पारितोषिक सोहळा आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पारितोषिक सोहळ्याचे अध्यक्ष महाविद्यालयाचे अध्यक्ष ॲड. शरदचंद्र शहा तर प्रमुख अतिथी म्हणून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कॅन्सिल कौन्सील मेंबर डॉ. मोहन पवारा व एन.फुक्टोचे अध्यक्ष डॉ. संजय सोनवणे होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक खैरनार यांनी प्रस्तावना मांडली. त्यामध्ये लोकनृत्य, समूहगीत, मूक नाटके, वैयक्तिक नृत्य, ललित कला, लावणी, देशभक्ती गीत आणि नृत्य, पारंपारिक नृत्य,

खानदेशी बोली नृत्य, आदिवासी नृत्य आणि इतर कला प्रकाराचा सहभाग नोंदविला गेला. कार्यक्रमाचे संचालन प्रा. अजबराव इंगळे तर प्रास्ताविक यशवंत कुलकर्णी यांनी आभार मानले. कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील ५५ विद्यार्थ्यांनी विविध कला प्रकारात सहभाग नोंदविला. सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक समितीकडून करण्यात आले आहे.

**युवारंग २०१९-२० मध्ये सहभाग -** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व पूज्य साने गुरूजी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, शहादा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवारंगमध्ये महाविद्यालयातील १६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. समूहनृत्य मध्ये शरद राजू भिल, कुणाल तानाजी गायकवाड, विद्या रामा तडवी, गीता नाईक, सोनाली शानाभाऊ भिल, कपिला वसावे, महादे वजा वसावे, तडवी मंजुषा दिनकर, संगीता दगडू मोहाने, समूह गीतामध्ये विद्या रामा तडवी, संगीता दगडू दिनकर, कपिला वसावे, माधुरी बोरसे यांनी सहभाग नोंदविला. मूकनाट्य मध्ये शरद राजू भिल, कुणाल तानाजी गायकवाड, संगीता सर्पा वळवी आणि माधुरी पांडुरंग या एफ.वाय.च्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. रांगोळी स्पर्धेमध्ये मालीच योगिता जयराम हिने सहभाग नोंदविला. फोटोग्राफीमध्ये लोकेश बागुल यांनी सहभाग नोंदविला. त्याने निसर्गचित्रे काढली. मेहंदीमध्ये पठाण हुस्नाआरा जब्बर खान आणि वक्तृत्व स्पर्धेमध्ये मारणार सचिन धनराज यांनी सहभाग नोंदविला.

महिला व्यवस्थापक म्हणून डॉ. प्रियंका सुलाखे तर पुरूष संघ व्यवस्थापक म्हणून प्रा. अजबराव इंगळे यांनी काम पाहिले. संगीत साथीदार म्हणून आदर्श विद्या मंदिराचे कासार सर आणि पवार सर होते.

*****

# विद्यार्थी विकास स्पर्धा परीक्षा केंद्र

## अहवाल शै. वर्ष २०१९-२०२०

**डॉ. के.डी. सोनवणे**

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्‌घाटन -**

निजामपूर जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे आदर्श कला महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्‌घाटन दि.२५ जुलै २०१९ ला करण्यात आले. कार्यक्रमाला उद्‌घाटक महणून नंदुरबार येथील नियोजन अधिकारी श्री.सचिन मगाडे तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे अध्यक्ष बाबासो. ॲड. शरदचंद्र जगन्नाथ शहा हे होते. स्पर्धा परीक्षा करण्यासाठी जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास असणे गरजेचे आहे. जर अभ्यासामध्ये सातत्य असेल तर स्पर्धा परीक्षा सहज पास केल्या जाऊ शकते. त्यांनी उद्‌घानटपर बोलत असतांना सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि शहरी भागातील विद्यार्थी यातील तुलना करून दिवसेंदिवस ग्रामीण विद्यार्थी पुढे येत आहे. महाविद्यालाचे प्राचार्य डॉ.अशोक खैरनार यांनी आपल्या प्रास्ताविकातून स्पर्धा परीक्षेचा न्यूनगंड दुर करण्याचा प्रयत्न केला. आपल्या अध्यक्षीय मनोगतात बाबासो.ॲड. शरदचंद्र शहा यांनी महाविद्यालायातील विद्यार्थ्यांनी पुढे येवून आपले जीवन सुखकर करावे हि सदीच्छा व्यक्त केली. महाविद्यालय वेळोवेळी होतकरू विद्यार्थाना मदत करेल असे आश्वासन यावेळी त्यांनी दिले. कार्यक्रमाचे सुत्रासंचालन आणि आभार समन्वयक प्रा.अजबराव इंगळे यांनी केले. प्रा प्रियांका सुलाखे यांनी क्रर्याक्रम यशस्वीतेसाठी प्रयंत्न केले. उद्‌घाटनाला निजामपूर शिक्षण प्रसारक मंडळ आणि प्राध्यापक मंडळी उपस्थित होते.

**स्पर्धा परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांची निवड :** महाविद्यालातील विद्यार्थांची निवड एका चाचणीद्वारे करण्यात आली. चाचणी एकूण ५० गुणांची होती. त्यावरून मेरीट नुसार विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थांना पारितोषिक देवून त्यांचा सन्मान करण्यात आला. परीक्षा नियोजनाचे काम संयोजक प्रा. अजबराव इंगळे आणि सहाय्यक प्रा.प्रणव गरुड यांनी केले. या स्पर्धा परीक्षेचा लाभ आदर्श विद्या जुनिअर महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि गावातील युवकांना त्यांच्या गुणवत्तेनुसार संधी देण्यात आली.

*****

## Add on Courses

### शै. वर्ष २०१९-२०२०

**प्राचार्य, डॉ. अशोक पी. खैरनार**

**प्रा. आतिष एस. मेश्राम**

शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता आदर्श कला महाविद्यलयातील विविध विषयांची Add on course सुरू करण्यात आले होते. नियमित अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या ज्ञानात अधिक भर पडवी, विद्यार्थ्यांना व्यावसायिक दृष्टीकोन मिळावा हा हेतू ठेवून महाविद्यालयात विविध विषयाची Add on course चालवण्यात आले होते. या अभ्यासक्रमाचा कालावधी एक महिन्याचा असून MCQ पॅटर्ननुसार परिक्षा घेवन निकाल जाहीर करण्यात आले होते. सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले होते. शैक्षणिक वर्ष २०१९-२० करितचे Add on course खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | प्राध्यापकांचे नाव / समन्वयकाचे नाव | Add on course शिर्षक | काला -वधी |
|---|---|---|---|
| १) | प्रा. ए.आर. इंगळे | An introductory course for students of literary studies | ३० दिवस |
| २) | डॉ. आय.पी. ठाकरे<br>प्रा. वाय.आर. कुलकर्णी | व्यावहारिक मराठी | ३० दिवस |
| ३) | डॉ. व्ही.जी. गुरव | हिन्दी भाषा एवं व्याकरण | ३० दिवस |
| ४) | डॉ. के.डी. सोनवणे | महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था (विशेष संदर्भ - जैताणे ग्रामपंचायत) | ३० दिवस |
| ५) | डॉ. एस.एल. लोटन व प्रा. के.व्ही. सोनवणे | ग्रामीण सामाजिक समस्यांचा अभ्यास | ३० दिवस |
| ६) | प्रा. पी.बी. मोरे | Modern Warfare आधुनिक युद्धपद्धती | ३० दिवस |
| ७) | डॉ. व्ही.एस. भामरे | Modern Agriculture आधुनिक शेती | ३० दिवस |
| ८) | डॉ. प्रियंका सुलाखे | Diet and Nutrition | ३० दिवस |
| ९) | प्रा. प्रणव जी. गरूड | साक्री तालुक्यातील ऐतिहासिक किल्ले व धार्मिक स्थळ | ३० दिवस |

*****

## Avishkar Competition

### Academic Year 2019-20

**Prof. Atish Meshram**

Avishkar encourages the original research and develop innovative minds by inculcating research culture. The Research Competition was initiated by the Vice-chancellor with a unique title i.e. "Avishkar". Research is an outcome basically of the innovative minds in the modern era with

demands of well equipped laboratories and other infrastructure. The desired outcome of “Avishkar” would not be limited to the quality of the research in the university. Therefore, the scope of the research is extended to the colleges too of the affiliated respective university

**Participation of College in Aviskar 2019-20**

The teachers and students of Nijampur Jaitane Shikshan Prasarak Mandal Adarsh College of Arts, Nijampur-Jaitane, Tal-Sakri, Dist-Dhule were participated in District level Avishkar Competition in the academic year 2019-20 sponsored by Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgoan and organized by S.G.Patil Arts, Commerce and Science College, Sakri. The Principal of the college Dr.Ashok Pitambar Khairnar guided and motivate to more and more students and teachers to actively participate in Avishkar competition. There were 18 students and 07 teachers participated in Avishkar in the academic year 2019-20. There were four students and three teachers have been selected in the district level for the university level round in Avishkar competition. Participated students and teachers have presented innovative fundamental research in Avishkar. Registrar, Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgoan. Hon’ble Prof.B.V.Pawar visited in our college and the awards were given by his auspicious hand to the students.

*****

## जिल्हास्तर आविष्कार स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांचे सत्कार

**प्रा. आतिश मेश्राम**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव व सिताराम गोविंद पाटील आर्टस्, कॉमर्स व विज्ञान महाविद्यालय, साक्री यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय आविष्कार २०१९ स्पर्धेत दि. ३० डिसेंबर २०१९ मध्ये आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे येथील एकूण ७ प्राध्यापक व १८ विद्यार्थी-विद्यार्थ्यांनी संशोधन पोस्टर सादरीकरण केले. त्यात एकूण ३ प्राध्यापक व ४ विद्यार्थीनींची विद्यापीठ स्तरीय आविष्कार स्पर्धेसाठी निवड झाली. विद्यापीठ स्तरावर कु. अश्विनी अविनाश जाधव आणि कु. गायत्री अनिल राणे हे दि. ८ जानेवारी २०२० रोजी 'Effect of Skipping on VO२ Max among Females in Rural Area' या विषयावर सादरीकरणाच्या पहिल्या फेरीसाठी निवडले गेले. प्रभारी कुलसचिव प्रा.डॉ. बी.व्ही. पवार यांनी त्यांचे व सहभागी संशोधकांचे कौतुक केले. आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे येथे दि. १२ जानेवारी २०२० ला भेट देऊन आविष्कार २०१९ मध्ये सहभागी प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे सत्कार करून गौरविण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. डी.एल. तोरवणे, प्रशासन अधिकारी, सी.गो. पाटील महाविद्यालय, साक्री व प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार यांनी सुद्धा विद्यार्थ्यांचे कौतुक केले. प्रा. मेश्राम, प्रा. इंगळे व प्रा. सुलाखे उपस्थित होते. तसेच निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व सन्मानीय सदस्य व आदर्श कला महाविद्यालयाचे अध्यक्ष मा.ॲड. शरदचंद्र जगन्नाथ शाह यांनी यशस्वी प्राध्यापक व विद्यार्थी-विद्यार्थीनींचे कौतुक केले.

*****

## Rukhmini-Narayan Bedse

### संशोधन पारितोषिक

### शै. वर्ष २०१९-२०२०

**प्रा. आतिश मेश्राम**

आदर्श कला महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय संशोधन पारितोषिक सुरु करण्यात आले

आजच्या या युगात प्रत्येक क्षेत्रात निरंतर संशोधन सुरु आहे. विश्वात प्रत्येक वाचकांमध्ये संशोधनाची गती वाढविण्यासाठी व रुजविण्यासाठी संशोधन संस्था किंवा संशोधक तंज्ञ संशोधन स्पर्धेच्या माध्यमातून संशोधनपर लेख मागवीत असतो. आमच्या आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे येथे या शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून American Citizen Prof. P. N. Patil यांचा वतीने Rukhmini-Narayan Bedse या नावाने संशोधन पारितोषिक प्रायोजित केले आहे. याची दखल घेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक पितांबर खैरनार यांनी विद्यार्थ्यांकडून संशोधन लेख मागविण्यात आले व त्या मधून एक विद्यार्थिनी कुअश्विनी जाधव हिची निवड करण्यात आली तिने 'Effect of Skipping On VO२ Max among Females in Rural Area' हा संशोधन लेख International Peer Reviewed Journal of Physiology, Nutrition and Physical Education (Vol.४, Issue No.२ and Page No.५७०-५७३) यात प्रकाशित केलेला आहे. उत्कृष्ठ संशोधन लेख लिहिण्यासाठी व प्रकाशित करण्यासाठी म्हणून तिला Rukhmini-Narayan Bedse हा संशोधन पारितोषिक सांस्कृतिक व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख अथिती मा.प्रा.मोहन पावरा,सदस्य व्यवस्थापन मंडळ, कवित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव, मा.डॉ.संजय सोनवणे, Senate सदस्य कवित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव, निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व सन्मानीय सदस्य व आदर्श कला महाविद्यालयाचे अध्यक्ष मा. Adv.शरदचंद्र जगन्नाथ शाह तसेच मा.प्राचार्य डॉ.अशोक पितांबर खैरनार यांचा हस्ते देण्यात आले व तिचे कौतुक केले.

*****

## Sexual Harrashment Cell

### अहवाल शै. वर्ष २०१९-२०२०

आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे ता. साक्री जि. धुळे येथे शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता महाविद्यालयात लैंगिक अत्याचार प्रतिबंध व त्यासंबंधी होणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्याकरिता Sexual Harrasshment Cell ची स्थापना करण्यात आली आहे. महाविद्यालयीन स्तरावर महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशानुसार समिती गठीत करण्यात आली होती. शैक्षणिक वर्षात या समितीच्या एकंदरीत चार सभांचे आयोजन करण्यात आले होते. यापैकी कुठल्याही सभेत लैंगिक अत्याचार संबंधी कोणतीही तक्रार आली नाही. या समितीद्वारे वेळोवेळी लैंगिक अत्याचारसंबंधी भित्तीपत्रके, बातम्या महाविद्यालयाच्या सूचना फलकावर दर्शविण्यात येतात. महाविद्यालयाच्या विद्यार्थीनींना वेळोवेळी मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात येते. वर्षभराच्या या समितीच्या कामकाजावर समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार यांचे संपूर्ण लक्ष असून त्यांनी मार्गदर्शन केल्याप्रममाणे समिती काम करत असते. यासाठी सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभते.

*****

## Anti Ragging Cell

### अहवाल शै. वर्ष २०१९-२०२०

आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे ता. साक्री जि. धुळे येथे शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता महाविद्यालयीन स्तरावर रॅगिंगला प्रतिबंध घालण्यासाठी समिती गठीत करण्यात आली होती. Anti Ragging Cell संदर्भात सविस्तर माहिती पदसिद्ध सदस्य, कार्ये, कार्यपद्धती याबद्दल माहिती समितीमार्फत विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात येते. रॅगिंग संदर्भातील सूचना, भित्तीपत्रके, विविध शैक्षणिक संस्थांमार्फत येणारी विविध परिपत्रके महाविद्यालयाच्या सूचना फलकांवर लावण्यात येतात. शैक्षणिक वर्षात एकंदरीत तीन सभा समितीच्या घेण्यात येतात. यात विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निराकरण करण्यात येते. परंतु अद्यावत एकही तक्रार समितीस निदर्शनास आली नाही. या संपूर्ण समितीचे कामकाज या समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार यांच्या अधिपत्याखाली होते. या समितीच्या कामकाजात सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर वृंद यांचे सहकार्य लाभले.

*****

## ऑनलाईन आंतरराष्ट्रीय योगा दिवस

### दि. २१ जून २०२०

निजामपुर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे जगन्नाथ कडवादास शहा आदर्श महाविद्यालय निजामपुर जैताणे आणि शारीरिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २१ जून २०२० रोजी ऑनलाइन पद्धतीने आंतरराष्ट्रीय योगा दिवस साजरा करण्यात आला. यात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक खैरनार, सर्व प्राध्यापक प्राध्यापक्तर कर्मचारी रुंद आणि विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. सहभागी सर्वांनी विविध आसन करतानाचा व्हिडिओ बनवला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर अशोक खैरनार यांनी योगासन प्राणायाम यांचे महत्त्व समजावून सांगितले. योगासन ही आपली भारतीय संस्कृती आहे तिला आपणच जपायला हवं असं त्यांनी सांगितलं. आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त प्रत्येकाने किमान दहा आसन तरी करावे आणि या योगा दिनानिमित्त योगासन आला आपल्या दैनदिनीत समाविष्ट करावे असे त्यांनी सांगितले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवरती प्रत्येक व्यक्ती जरी मैदानापासून दूर असला तरी घरूनच त्यांनी योगा करून योगा दिवस साजरा करावा असा हेतू डोळ्यासमोर ठेवून सर्वांचा योगा करताना चा व्हिडीओ मागवण्यात आला होता त्या सर्व व्हिडीओना एकत्रित करून त्याला महाविद्यालयाच्या यूट्यूब चैनलवर प्रकाशित करण्यात आले. या संपूर्ण ऑनलाइन कार्यक्रमाचे आयोजन शारीरिक शिक्षण संचालिका डॉ. प्रियंका सुलाखे यांनी क्ले होते यासाठी सर्व प्राध्यापक वृंद प्राध्यापकेतर कर्मचारी वर्ग यांचे सहकार्य लाभले.

*****

## ऑनलाईन Quiz

### शै. वर्ष २०१९-२०२०

निजामपुर जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे जगनाथ कडवादास शाह आदर्श महाविद्यालय निजामपुर जैताने आणि शारीरिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कोरोनाच्या पार्श्वभूमीवरती कोरोना संदर्भात जनजागृती व्हावी हा हेतू डोळ्यासमोर ठेवून कोरोनासंदर्भात दि.०४/०६/२०२० रोजी गुगल फॉर्मच्या माध्यमातून ऑनलाईन quiz चे आयोजन करण्यात आले. या quiz मध्ये कोरोनासंदर्भात असणारे साधे साधे प्रश्न विचारण्यात आली. जेणेकरून ज्या लोकांच्या मनात कोरोना संदर्भात काही गैरसमज

असतील तेही या quize च्या माध्यमातून दूर करता येतील. या quize साठी विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. तसेच शारीरिक शिक्षण विभागामार्फत गूगल क्लासरूम वर अनेक वेगवेगळ्या खेळाची व्हिडिओ विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवण्यात आली. या व्हिडिओ मार्फत वेगवेगळ्या खेळाविषयी कितपत ज्ञान विद्यार्थ्यांनी आत्मसात केले हे तपासण्यासाठी शारीरिक शिक्षण विभागामार्फत ऑनलाइन quiz चे आयोजन करण्यात आले. ज्या ज्या खेळाचा व्हिडीओ गुगल क्लास रूम वरती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला असेल त्या व्हिडिओ संदर्भातली quiz आयोजित करण्यात आली व त्यात quiz मध्ये त्या खेळा संदर्भातली प्रश्न देण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांनी त्या व्हिडिओतून किती ज्ञान आत्मसात केले. याचा एक अंदाज बांधण्यात मदत झाली. या सर्व quiz ची प्रेरणा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक खैरनार यांनी दिली. आयोजित अशा वेगवेगळ्या quiz च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्या विषयासंदर्भात ज्ञान होते तसेच त्यांना तंत्रज्ञानही अवगत होते असे सरांनी सांगितले. या वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या माध्यमातून आपल्याला कोरोना च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या अधिकच जवळ नेता येईल असे सरांनी सांगितले. या सर्व गोष्टींची आयोजन शारीरिक शिक्षण संचालिका डॉ. प्रियंका सुलाखे यांनी केले तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृद प्राध्यापक इतर कर्मचारी वर्ग यांचे सहकार्य लाभले.

*****

## जागतिक महिला दिन ८ मार्च २०२०

### माझी आई माझे महाविद्यालय

निजामपूर जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे जगन्नाथन कडवादास शहा आदर्श महाविद्यालय निजामपुर जैताणे येथे दि. ८ मार्च २०२० रोजी जागतिक महिला दिनानिमित्त महाविद्यालयांमध्ये माझी आई माझे महाविद्यालय हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थिनी व त्यांच्या आईंना महाविद्यालयांमध्ये आमंत्रित केले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थीत सर्व मातेचा व विद्यार्थिनींचा जागतिक महिला दिनानिमित्त गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. महाविद्यालयामध्ये वर्षभरात कुठले उपक्रम, कार्यक्रम घेतले जातात, कोणत्या योजना राबवल्या जातात याची संपूर्ण माहिती प्रास्ताविक स्वरुपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक पी.खैरनार यांनी सादर केली. आईच्या ज्ञानात अधिकच भर पडावी म्हणून व्याख्यानाचेही आयोजन करण्यात आले होते. आईनेही दैनदिन कामातून संसारातून स्वतःसाठी थोडा वेळ काढावा हा हेतू डोळ्यासमोर ठेवून आईसाठी एक मनोरंजन खेळाचे आयोजन केले जाते. यामुळे दैनदिन जीवनाच्या कामातून मनावर शरीरावर आलेला थकवा मळकट कुठेतरी दूर करण्यात मदत होते. आणि त्या नवीन प्रेरणेने काम करण्यास तयार होतात. हा हेतू डोळ्यासमोर ठेवून माझी आई माझे महाविद्यालय या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयामार्फत राबवण्यात आलेल्या प्रत्येक उपक्रम यामुळे आमच्या मुली या प्रत्येक क्षेत्रात सक्षम बनत चालले आहे आणि याचा आम्हाला अभिमान आहे असे त्यांनी सांगितले. आदर्श महाविद्यालयामार्फत फक्त पुस्तकी ज्ञान न देता प्रत्येक क्षेत्राचे प्रात्यक्षिक ज्ञान दिले जाते ही फार मोठी गोष्ट आहे. असे नवनवीन उपक्रम महाविद्यालयाने दर वर्षी राबवावे अशी अपेक्षा विद्यार्थिनींच्या आईमार्फत करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक खैरनार म्हटले की आम्ही ज्या प्रमाणे उपक्रम महिलांच्या सक्षमीकरणासाठी चालवतो या सर्व उपक्रमात महिलांनी पुढे येऊन सहभाग घ्यावा. महाविद्यालयात चालवले जाणारे

